दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकः बाळासाहेब मस्के

## छत्तीसगडमध्ये चकमक

कारवाई:७ नक्षलवाद्यांचा खात्मा



पुण्यभूमी प्रतिनिधी

बिजापूर :छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यातील करेगुट्टा जंगल परिसरात सुरक्षा जवान आणि नक्षल्यांत जोरदार चकमक सुरू असून, आतापर्यंत झालेल्या चकमकीत ७ नक्षल्यांचा खात्मा करण्यात आला. घटनास्थळी सुमारे १ हजार नक्षलवादी उपस्थित असल्याची माहिती समोर आली आहे. या नक्षल्यांना आता १० हजार सुरक्षा जवानांनी घेरले आहे. त्यामुळे ही सर्वांत मोठी कारवाई मानली जात आहे.

जिल्हा राखीव रक्षक दल, बस्तर फायटर्स, विशेष टास्क फोर्स, राज्य पोलीस दल, केंद्रीय राखीव पोलीस दल आणि कोब्रा बटालियन यांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई सुरू केली असून, गुप्तचर माहितीच्या आधारे ही मोहीम आखण्यात आली. बिजापूर जिल्ह्यातील उसूर पोलिस ठाणे क्षेत्रातील गलगम–नडपल्ली परिसरातील डोंगराळ भागात ही चकमक सुरू आहे. परिसरात सतत गोळीबाराचा आवाज ऐकू येत आहे. याच दरम्यान, एक आयईडी स्फोट झाला असल्याची माहितीही समोर आली.मोस्ट वॉन्टेड नक्षल कमांडर हिडमा आणि बटालियन प्रमुख देवा याच्यासह इतर महत्त्वाच्या नक्षल नेत्यांची हालचाल या भागात असल्याची माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. त्यानंतर व्यापक पातळीवर ही कारवाई सुरु करण्यात आली. कालपासून सुरू असलेली ही चकमक नडपल्लीच्या पहाडी परिसरात जोरात सुरू असून, सतत गोळीबाराचा आवाज कानावर येत आहे. ड्रोनच्या माध्यमातून चकमकीवर सुरक्षा दल सतत लक्ष ठेवून आहे.

### १ हजार नक्षलवाद्यांना घेरले

या कारवाईत ३ राज्यांतील २० हजारांहून अधिक सुरक्षा दलाचे जवान सहभागी असून, सुमारे १ हजार नक्षलवाद्यांना घेरण्यात आले आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

## पर्यटक विशेष विमानाने परत

मुख्यमंत्री:पहलगाम येथे दहशतवादी हल्ला

पुण्यभूमी प्रतिनिधी



मुंबई:पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांमध्ये सध्या भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे तिथे अडकलेल्या ८३ पर्यटकांना आज (२४ एप्रिल)महाराष्ट्रात आणण्यासाठी राज्य सरकारकडून प्रयत्न केले जात आहेत.दरम्यान, जम्मू–काश्मीरमधील पहलगाम येथे मंगळवारी (२२ एप्रिल) झालेल्या दहशतवादी हल्ल्यात सुमारे २८ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. यात महाराष्ट्रातील ६ नागरिकांचाही समावेश आहे. दरम्यान, दहशतवादी हल्ल्यानंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांमध्ये सध्या भीतीचे वातावरण आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार आणि सूचनांनुसार, महाराष्ट्रातील पर्यटकांना श्रीनगरहून मुंबईत परत आणण्यासाठी एका विशेष विमानाची व्यवस्था करण्यात आली आहे. इंडिगोचे हे विमान गुरुवारी (२४ एप्रिल) ८३ पर्यटकांना मुंबईत परत आणेल.

देवेंद्र फडणवीस यांनी ट्वीट करताना म्हटले की, गुरुवारी आणखी एका विशेष विमानाची व्यवस्था करण्याचे प्रयत्न सुरू आहेत आणि त्यासाठी प्रवाशांची यादी तयार करण्याचे काम सुरू आहे. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यासाठी पूर्ण सहकार्य करत आहेत.




बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

## गर्दीचा फायदा घेत गंठण चोरी करणाऱ्या दोन महिला गजाआड



### साडेचार तोळे सोन्याचे दागिने जप्त

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी : परळी शहरातील हालगे गार्डन येथे पार पडलेल्या शिवकथेच्या कार्यक्रमात गर्दीचा फायदा घेत महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरणाऱ्या दोन महिला आरोपींना स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांच्या पथकाने केवळ काही दिवसांत ताब्यात घेत अचूक कारवाई केली आहे. आरोपींकडून साडेचार तोळे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले असून, त्यांची एकूण किंमत सुमारे २,६५,०००/– रुपये इतकी आहे.

दिनांक १३ नोव्हेंबर २०२४ रोजी हालगे गार्डन, परळी येथे आयोजित शिवकथेच्या कार्यक्रमात महाप्रसादानंतर गर्दी झाल्याच्या पार्श्वभूमीवर उमाबाई उत्तमराव मिटकर (वय ६६, रा. विद्यानगर, परळी) यांच्या गळ्यातील दोन तोळ्यांचे सोन्याचे गंठण आणि कमलाबाई बांगड यांची सोन्याची चैन अज्ञात महिलांनी चोरी केली होती. या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १७६/२०२४ अन्वये कलम ३७९ भादंविनुसार गुन्हा नोंदविण्यात आला होता.या गंभीर घटनेची दखल घेत मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी तात्काळ आरोपींचा शोध घेण्याचे आदेश स्थानिक पान २ वर

## देशमुख हत्या प्रकरणात आमचा कुठेही सहभाग नाही

वाल्मीक कराडच्या वकिलांचा दावा; पुढील सुनावणी ७ मे रोजी

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड :संतोष देशमुख हत्या प्रकरणाची आज बीड न्यायालयात पुन्हा एकदा सुनावणी झाली. या सुनावणीत मुख्य आरोपी म्हणून नामनिर्दिष्ट असलेल्या वाल्मीक कराड याच्या वकिलांनी कोर्टात जोरदार दावा करत सांगितले की, या प्रकरणात आमच्या अशिलाचा प्रथमदर्शनी कुठेही सहभाग दिसून येत नाही. त्यांच्या युक्तिवादानंतर कोर्टाने पुढील सुनावणी ७ मे रोजी घेण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे या दिवशी प्रसिद्ध सरकारी वकील उज्ज्वल निकम स्वतः न्यायालयात हजर राहणार आहेत.

गत ९ डिसेंबर रोजी मस्साजोग (ता. गेवराई) येथील सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या झाली होती. या प्रकरणात माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय समजले जाणारे वाल्मीक कराड व अन्य काही आरोपींच्या पान २ वर

संतप्त | पहलगाम हल्ल्यानंतर घेतला निर्णय

## अटारी–वाघा बॉर्डरवर रिट्रीट सेरेमनी

पुण्यभूमी प्रतिनिधी

अटारी : जम्मू काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली आहे. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी २६ निष्पाप पर्यटकांची गोळ्या झाडून निर्घृणपणे हत्या केली आणि पळ काढला. या हल्ल्यानंतर सुरक्षा दलांनी शोध मोहीम हाती घेतली आहे. सरकारनेही पाकिस्तानविरोधात कडक पावले उचचली आहेत. सिंधू करार स्थगित करण्यासोबत भारताने पाच मोठे निर्णय घेतले. दुसरीकडे या दहशतवादी हल्ल्याचा परिणाम अटारी वाघा सीमेवरही पाहायला मिळाला. भारत सरकारने अटारी बॉर्डरजवळील



चेकपोस्ट बंद केली आहे. त्यानंतर अटारी बॉर्डरवर दररोज होणा–या रिट्रीट सेरेमनीमध्ये बदल पाहायला मिळाला.

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, पंजाबमधील अटारी, हुसैनीवाला पान २ वर



# जय नागाई! जय बसवण्णा!! शरणु शरणार्थी!!!

जगातील पहिल्या लोकसंसदेचे- अनुभव मंटपाचे प्रवर्तक, मंगळवेढा संस्थानचे महसूलमंत्री, युध्दकुशल सरसेनापती, कल्याण राज्याचे प्रधानमंत्री, बहुजनांना वैदिक- वर्णाश्रम धर्मातून मुक्त करणारे बहुजन महानायक, उच्च कोटीचे संघटक, वैश्विक तत्वज्ञ, अक्षरज्ञानी, कन्नड वचनसाहित्याचे निर्माते, थोर गणितज्ञ, वास्तुतज्ञ, महान इतिहासकार, गुरु-लिंग-जंगम संकल्पनेचे जनक, कायक- दासोह सिध्दांत संस्थापक, दयानिधी, करुणाकर, मैत्रीसंवादी, भक्तिभांडारी, सर्वकष महान क्रांती घडवून आणणारे युगनायक, लोककल्याणकारी अर्थतज्ञ, भारतातील सर्वोत्तम भूमिपुत्रांमधील सर्वोच्च मानबिंदू असलेले लिंगायत धर्माचे धर्मसंस्थापक, क्रांतिवीर बसवण्णा यांच्या ९२० व्या जयंती दिनी बसवण्णा यांच्या मौलिक विचार आणि युगप्रवर्तक कार्यास विनम्र अभिवादन.!आज लिंगायत धर्माचे धर्मसंस्थापक क्रांतीवीर बसवण्णा यांच्या ९२० व्या जयंती दिनानिमित्त निमित्ताने लिंगायत विचारधारेला अनुसरून जीवन जगणा-या तमाम लिंगायत समाजाच्या बांधव आणि भगिनींना माझ्याकडून हार्दिक हार्दिक शुभेच्छा.!


क्रांतिवीर बसवण्णा यांचा जन्म कर्नाटकात विजापूर जवळील बागेवाडी या तालुक्याच्या गावी झाला. बसवण्णा यांचा जन्म सन- ११०५ मधील अक्षयतृतीया म्हणजेच दि.२५ एप्रिल ११०५ या दिवशी बहुजन समाजातील कम्मे कुळात (संदर्भ- बसवराज देवर रगळे) झाला. बसवण्णा यांच्या वडिलांचे नाव मंडीगेय मादिराज आणि आईचे नाव मादलांबिका. बसवण्णांचे आजोबा रुद्रमय्या -आजी पद्मावती तर पणजोबा केसिमय्या हे सरवडीचे महामंडलेश्वर होते. बसवण्णास मोठे भाऊ देवराज तर मोठी बहिण नागाई. तसेच बसवण्णा यांना संगणबसव नावाचा मुलगा होता, जो अल्पायुषी ठरला.

बाराव्या शतकात कल्याण राज्यावर चालुक्य घराण्याची राजवट होती तर राजा बिज्ज्ळ हा चालुक्य घराण्यातून आलेल्या नागलदेवींचा मुलगा होता. आणि हा बिज्जळ हा मंगळवेढा संस्थानाचा महामंडलेश्वर (अधिपती) म्हणून कार्यरत होता. महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ: कवी हरिहरने सन- १२०० मध्ये बसवण्णा यांच्यावरील पहिले 'बसवराजदेवर रगळे' हे कन्नड रगळे (काव्य) लिहिले. पुढे सन- १२०० मध्ये पालकुरके सोमनाथ यांनी तेलगू भाषेत 'बसवपुराणम' हा ग्रंथ लिहिला आणि सन-१३६९ मध्ये भीम कवी यांनी 'बसवपुराणम' या ग्रंथाचे कन्नडमध्ये भाषांतर केले.

लिंगायत क्रांतिनायक बसवण्णा यांच्या वास्तव्याबाबत संक्षिप्त माहिती:बागेवाडी- ११०५ ते १११३- ०८ वर्षे.

इंगळेश्वर- १११३ ते १११९- ०६ वर्षे. (आई वडील लिंगैक्य झाल्यानंतर बसवण्णा यांचे इंगळेश्वर येथे आजोळी आजी-आजोबा- मामा, मोठी बहिण नागाई आणि नागाई- शिवनागदेव यांच्या कडून पालनपोषण).

कुडलसंगम- १११९ ते ११३१- १२ वर्षे. (ईशान्यगुरु यांच्याकडून सर्वांगीण शिक्षणाचे धडे गिरवले). मंगळवेढा- ११३१ ते ११५२- २० वर्षे (बसवण्णा यांचे मंगळवेढा येथे आगमन, बिज्जळ राजाच्या राज्यात महसूलमंत्री, सेनापती या पदावर कार्यरत आणि सेनापती सिध्दरसांची मुलगी निललोचना यांच्याशी विवाह).बसवकल्याण- ११५२ ते ११६७- १६ वर्षे (राजा बिज्जळाने कल्याण राज्य बळकावले. त्याने मंगळवेढा येथील राजधानी हलवून कारभार कल्याणला स्थलांतरीत केला आणि बिज्जळ राजाने बसवण्णा यांना प्रधानमंत्री पदी नियुक्त केले).कूडलसंगम- कार्तिक पौर्णिमा ११६७ (राजा बिज्जळाच्या दरबारातील १८ ब्राह्मण मंत्री- अधिका-यांनी पेटविलेल्या प्रतिक्रांतीमुळे



बसवण्णांना कल्याण राज्यातून हद्दपार करण्यात येते. त्यानंतर बसवण्णा कूडलसंगमला प्रस्थान करतात. येथेच बसवण्णा यांच्यासह निललोचना व सचिव हडपद अप्पण्णा यांचा करुण अंत होतो). एकूणच बसवण्णा हे ६२ वर्षे ६ महिन्याचे झंझावाती आणि क्रांतिकारी आयुष्य जगले.बसवण्णांनी आपल्या दया, करुणाशील मैत्रीसंवादाने बहुजन समाजातील शोषित वर्गाला आपल्या लिंगायत विचारधारेकडे आकर्षित केले. बसवण्णा एका वचनात म्हणतात-इवनारव, इवनारव, इवनारवनेंदनिसदिरय्या।

इव नम्मव, इव नम्मव, इव नम्मवनेंदनिसय्या।।

(वचन क्र.६२)मराठी अनुवाद:हा कोण, हा कोण, हा कोण.?,असे म्हणू देऊ नका;हा आमचा, हा आमचा, हा आमचा,असेच म्हणावे कुडलसंगमदेवा.! बसवण्णांच्या आपुलकीच्या वागणुकीने शोषित बहुजन समाजाच्या मनावर त्यांच्या समतेच्या विचार आणि कार्याची छाप पडली आणि तो बसवण्णा सभोवती एकत्रित झाला.. संघटीत झाला. पुढे बसवण्णांच्या गतिमान नेतृत्वाखाली व मोठी बहिण नागाई, जीवनसाथी निललोचना, भाचा चन्नबसवण्णा, मेहुणे शिवनागदेव याशिवाय बहुजन समाजातील ७७० महानुभावी क्रांतिकारकांच्या साथ-सहयोगाने एका महान क्रांतीला जन्म दिला. या महान क्रांतीतूनच लिंगायत धर्माची स्थापना झालेली आहे.

माता नागाई- बसवण्णा स्थापित लिंगायत हा स्वावलंबी, स्वाभिमानी, आत्मनिर्भर, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि समतामूलक विचारधारा असलेला स्वतंत्र धर्म आहे. या धर्मात जात, वर्ण, वर्ग, लिंग यावरुन उच्च-नीचतेस स्थान नाही. मात्र सन ११६७ समकालीन कवी हरिहरने बिज्जळ दरबारातील प्रतिक्रांती करणा-या १८ ब्राह्मण मंत्री- अधिका-यांची नांवे लिहून ठेवली आहेत आणि सन १६७८ मैसूर राजा चिक्कदेवराय यांनी लादलेल्या कराविरोधात लिंगायत मठाधिशांनी आंदोलन पुकारले. यावेळी ७७० मठाधिशापैकी ४४० मठाधिशांची यावेळी विश्वासघाताने सामुहिक हत्याकांड घडविले च्या प्रतिक्रांतीने या धर्मात ७० जाती आणि ३५० पोटजाती आहेत. आज या इतिहास प्रमाणित धर्माला स्वतंत्र धर्म मान्यता नसल्याने धार्मिक विधीमान्यता, अल्पसंख्याक म्हणून मिळत असलेले शैक्षणिक प्रतिनिधित्व (आरक्षण), नोकरीतील प्रतिनिधित्व, धार्मिक अनुदान, शिक्षण संस्थांना मिळणाऱ्या विविध प्रकारच्या सवलती, अनुदान या सर्व प्रकारच्या शासकीय लाभांना हा समाज मुकला आहे. शीख धर्माचे दहावे गुरु, गुरु गोविंदसिंग यांच्या ३०० व्या स्मृतीदिनानिमित्त ऑक्टोबर २००८ मध्ये केंद्रीय अर्थसंकल्पात रु.१२०० कोटी आणि राज्य अर्थ संकल्पात वाढीव खर्चासह रु.३००० कोटी रुपये विनियोग केला. हे सर्व शासकीय लाभ शीख धर्मास शासन मान्यता असल्याने प्राप्त झाले आहेत. या उलट लिंगायत धर्मास धर्म मान्यता मिळाली नसल्याने सन १९६७ मध्ये बसवण्णा यांच्या ८०० व्या स्मृतिदिनानिमित्त १५ पैसे किमतीचे टपाल तिकीट काढून भारत सरकारने स्मृतीदिन साजरा केला. तसेच बसवण्णा यांच्या ९०० व्या जयंती दिनी दि. २५ एप्रिल, २००५ रोजी भारत सरकारने बसवण्णा यांच्या जयंती उत्सवासाठी एक रुपयाही खर्च केलेला नाही. हे सर्व नुकसान लिंगायत बांधवांच्या आपल्या दैदिप्यमान इतिहासाबाबत अनभिज्ञ असल्यामुळे झालेले आहे.

लिंगायत बांधवांनी लिंगायत धर्मास धर्म मान्यता मिळविण्यासाठी काय काय करणे आवश्यक आहे..?

सर्वप्रथम लिंगायत बांधवांनी बाराव्या शतकातील लिंगायत क्रांती आणि नंतर घडवून आणलेल्या प्रतिक्रांतीचा इतिहास अभ्यासणे अत्यावश्यक आहे. त्याशिवाय लिंगायत धर्म मान्यतेसाठी पूरक असणा-या खालील बाबींचा प्रचार प्रसार करणे नितांत आवश्यक बनले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात सन १८७२ मध्ये इंग्रजांनी केलेल्या राष्ट्रीय जणगणनेत म्हैसूर प्रांतातील शिरगणतीत 'इ' विभागात जैन, बौद्ध आणि लिंगायत यांच्या स्वतंत्र धर्म म्हणून नोंदी झालेल्या आहेत. पुढे सन- १९४१ पर्यंत नियमितपणे झालेल्या जनगणनेत लिंगायत बांधवांच्या स्वतंत्र नोंदी झाल्या आहेत. परंतु सन १९५१ पासूनच्या जनगणनेत स्वतंत्र धर्म म्हणून लिंगायत नोंदी जाणिवपूर्वक बंद करण्यात आल्या आहेत. वास्तविक ब्रिटिश विद्वान किटेलने सन १८७५- डळपसरूरीं श्रळींशीरींीश, सर विल्कनसने सन १८९०- द्धहश क्ळीीू`ष ींी, एंथावेनने सन १९०२- प शीीरू`प ींहश ठळींीरश्री `ीसरपळीरींळेप`ष ींहश श्रळपसरूरीी शिवाय सन १९०४ च्या भारत सरकारने 'हिदुस्थान धर्मकोश' या ग्रंथात लिंगायत हिंदू पेक्षा भिन्न असल्याचे स्पष्ट करुन लिंगायत विचारधारेचे मांडणी केलेली आहे. दि. १५ डिसेंबर, १९२८ रोजी म्हैसूर स्टार पत्रिकेत बसवलिंगाप्पा जिरगे यांनी लिंगायत बांधवांना लिंगायत हा स्वतंत्र धर्म असून येणाऱ्या १९३० च्या जणगणनेत जैन, बौद्ध, शिख, पारसी धर्माप्रमाणे स्वतंत्र धर्म म्हणून नोंद करण्याचे आवाहन केले होते. दि. ३१ डिसेंबर, १९४० रोजी दावणगेरेमध्ये वीरशैव महासभेत या समस्येवर चिंतन बैठकीत 'लिंगायत हे हिंदू नव्हेत.' असा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. सन १९४१ साली 'लिंगायत एकता संघ' स्थापन करण्यात आला. या संघटनेच्या माध्यमातून उपलब्ध संदर्भासह लिंगायत धर्मास सवलतीसाठी पत्रव्यवहार सादर करण्यात आला. सन १९४२ मध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या काळात लॉर्ड स्टॅफोर्ड यांनी इंग्रजांना मदत करण्यासाठी लिंगायत धर्म प्रमुखांना भेटून 'लिंगायत मिलिटरी ब्रिगेड' स्थापन करण्याची विनंती केली. यास्तव 'लिंगायत मिलिटरी ब्रिगेड' बेळगांव येथे स्थापन करण्यात आली. यात हजारो लिंगायत युवकांनी सहभाग घेऊन लढाईत आपले क्षात्रतेज गाजविले. आणि हि 'लिंगायत मिलिटरी ब्रिगेड' ब्रिटिश सरकारच्या प्रशंसेस पात्र ठरली. यानंतर यावेळी लिंगायत धर्म प्रमुखांनी इंग्रज सरकारकडे चार मागण्या मांडल्या होत्या. (१) लिंगायत हा स्वतंत्र धर्म असून या धर्मास अल्पसंख्याक म्हणून गणले जावे.(२) लिंगायत धर्माच्या लोकांना सरकारमध्ये प्रतिनिधित्व देण्यात यावे.(३) लिंगायत धर्माच्या लोकांना सरकारी नोकरीत आरक्षण प्रतिनिधित्व द्यावे.(४) संविधान मसुदा समितीत लिंगायत धर्माच्या लोकांना प्रतिनिधित्व देण्यात यावे.

मित्रहो, या चौथ्या मागणी नुसार एस.निजलिंगप्पा, एच. सिध्दविराप्पा, टी. सिध्दलिंगय्या, एम.बी.मुनवळ्ळी आणि रत्नाप्पा कुंभार या पाच लिंगायत धर्म बांधवांना संविधान मसुदा समितीत महत्त्वाचे स्थान मिळाले होते. 'लिंगधारण चंद्रिके' या ग्रंथात एम.आर.साखरे यांनी लिंगायत हे हिंदू,शैव आणि वीरशैव यांच्याहून भिन्न असून लिंगायत हा स्वतंत्र धर्म असल्याचे सविस्तर विवेचन केले आहे. १९९७ मध्ये 'बसवण्णा आणि लिंगायत धर्म' या ग्रंथात जगप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ डॉ.हिरेमल्लूर ईश्वरन यांनी 'लिंगायत: हिंदू- ब्राह्मणी धर्म नव्हे; स्वतंत्र धर्म' या नावाने स्वतंत्र प्रकरण लिहिलेले असून या विषयावर सविस्तर मांडणी केली आहे. कुडलसंगम येथे माते महादेवी यांनी सन १९९८ साली 'लिंगायत धर्म महासभा' स्थापन केली आहे. माते महादेवी यांच्या नेतृत्वाखाली दि. १७, १८ आणि १९ ऑक्टोबर, १९९७ रोजी स्वतंत्र लिंगायत धर्म मान्यतेसाठी दिल्ली येथे लाल किल्ल्याजवळ आंदोलन केले होते. माते महादेवी यांच्या अध्यक्षतेखाली दि. २७ ऑक्टोबर, २००३ रोजी दिल्ली येथे मा.प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांना स्वतंत्र लिंगायत धर्म मान्यतेसाठी निवेदन देण्यात आले. माते महादेवी यांच्या अध्यक्षतेखाली दि.१८ डिसेंबर, २०१४ रोजी महामहीम राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांना लिंगायत धर्म मान्यतेसाठी निवेदन देण्यात आले. कर्नाटकातील युनिव्हर्सिटीच्या तत्वज्ञशास्त्राचे प्राध्यापक डॉ.एन.जी.महादेवप्पा यांनी 'लिंगायत हिंदू नव्हेत.'(२००४) डळपसरूरीी रीश पींं क्ळपवींी, (२०१०) अशी अनुक्रमे कन्नड आणि इंग्रजी भाषेत पुस्तके लिहून सविस्तर चर्चा केली आहे. दि. ०९ फ `ब्रुवारी, २०१० रोजी बिदर मध्ये बसव दलाच्या वतीने स्वतंत्र लिंगायत धर्म महारॅली काढून धर्म मान्यतेसाठी निवेदन देण्यात आले. महान संशोधक डॉ.एम.एम. कलबुर्गी यांनी विविध नियतकालिकांतून 'लिंगायत आणि वीरशैव हे वेगवेगळे' आणि 'लिंगायत धर्म हा स्वतंत्र धर्म' याविषयी तर्कशुद्ध आणि संशोधनात्मक दृष्टीने अत्यंत विपुल प्रमाणात लेखन केले आहे. दि. ०७ जानेवारी, २०१४ रोजी लिंगायत महासभेच्या वतीने मोर्चा काढण्यात आला होता. महाराष्ट्र राज्यातील लिंगायत संघर्ष समितीच्या वतीने थोर स्वातंत्र्यसैनिक मुर्गेप्पा खुमसे यांच्या नेतृत्वाखाली ५० लिंगायत बांधवांनी कराड येथे आमरण उपोषणाला सुरुवात केली होती. यानंतर दि. १४ ऑगस्ट, २०१४ रोजी तत्कालीन महाराष्ट्र सरकारने मा.दिलीप सोपल यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली. लिंगायत समाजाचा जइउ समुहात समावेश करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समितीच्या वतीने दि. २६ ऑगस्ट, २०१४ रोजी झालेल्या बैठकीत महाराष्ट्र सरकारच्या वतीने लिंगायत धर्मास स्वतंत्र धर्म म्हणून मान्यता मिळविण्यासाठी आणि अल्पसंख्याक दर्जा देण्यासाठी विहित मार्गाने केंद्र सरकारकडे शिफारस करण्यात येईल असा निर्णय घेतला. लिंगायत धर्मास स्वतंत्र धर्म म्हणून मान्यता मिळविण्यासाठी महाराष्ट्रात दि.३ एप्रिल, २०१६ रोजी अखिल भारतीय लिंगायत समन्वय समिती स्थापन करण्यात येऊन या समितीने अहमदपूर, नांदेड, मिरज, बसवकल्याण आणि कुडलसंगम येथे बैठका घेतल्या आणि यापुढील काळातील आंदोलनाची दिशा ठरविण्यात आली. लिंगायत मठाधिश, समाजातील प्रमुख, संघटक यांनी कर्नाटक सरकारने केवळ लिंगायत नावाने स्वतंत्र धर्म म्हणून मान्यता मिळविण्यासाठी शिफारस करण्यात यावी अशी विनंती करण्यात आली होती. कारण दि. १४ जून, २०१७ रोजी वीरशैव महासभेने कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना वीरशैव लिंगायत या नावाने धर्म मान्यतेसाठी केंद्र सरकारकडे शिफारस करावी अशी विनंती केली होती. केवळ 'लिंगायत' नावाने स्वतंत्र धर्म म्हणून मान्यता मिळविण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करण्यात यावी या मागणीसाठी दि.१९ जुलै, २०१७ रोजी बिदर येथे भालकीचे डॉ.बसवलिंग पट्टद्देवरु यांच्या नेतृत्वाखाली आणि माते महादेवी, श्री शिवलिंग शिवाचार्य, श्री कोरणेश्वर स्वामी यांच्या उपस्थितीत पहिला लिंगायत महामोर्चा काढण्यात आला. या ऐतिहासिक धर्म मान्यता आंदोलनात दोन लाख लिंगायत बांधव आणि भगिनी उपस्थित होते. यानंतर बेळगाव २२ ऑगस्ट, २०१७, लातूर ०३ सप्टेंबर, २०१७), कलबुर्गी २४ सप्टेंबर, २०१७, हुबळ्ळी ०५ नोव्हेंबर, २०१७, सांगली ०३ डिसेंबर, २०१७, विजापूर १० डिसेंबर, २०१७, यवतमाळ आणि कोल्हापूर २८ जानेवारी, २०१८, औरंगाबाद ०८ एप्रिल, २०१८, नाशिक २९ एप्रिल, २०१८, सोलापूर ०३ जून, २०१८ या ठिकाणी लिंगायत धर्मास स्वतंत्र धर्म म्हणून मान्यता मिळविण्यासाठी महामोर्चे निघाले. लिंगायत धर्मास स्वतंत्र धर्म म्हणून मान्यते संबंधित अभ्यासासाठी कर्नाटक सरकारने दि. २२ डिसेंबर, २०१७ रोजी न्यायमूर्ती श्री नागमोहन दास यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची समिती नेमली होती. या समितीने दि. १९ मार्च, २०१८ रोजी कर्नाटक राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा होऊन लिंगायत धर्मास स्वतंत्र धर्म म्हणून मान्यता मिळविण्यासाठी शिफारस करण्यात आली आणि याबरोबरच १५० पानांचा अहवाल केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला. मात्र केंद्र सरकारने या विषयावर मौन बाळगले आहे.

आजच्या घडीला प्रत्येक लिंगायत बांधवांने स्वतंत्र धर्म म्हणून शासन मान्यता मिळविण्यासाठी अत्यंत सजगतेने कार्यरत व्हावे व जनजागृती, प्रबोधन करण्यासाठी लिंगायत विचारधारेला प्रवाहित करणार्या वैचारिक संघटनेची बांधणी करुन संघर्ष करणे हि काळाची गरज आहे. ज्यामुळे समाजाला संविधानाने बहाल केलेले मौलिक हक्क - अधिकार माहिती होईल. संविधानाने लिंगायत बांधवाच्या कल्याणासाठी बहाल केलेली मौलिक हक्क- अधिकाराबाबतची संविधानातील कलमे पुढीलप्रमाणे आहेत.कलम २५- धर्म स्वातंत्र्याचा हक्क (धर्माचे मुक्त प्रकटीकरण, आचरण व प्रचार), कलम २६- धार्मिक व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य, कलम २७- धर्म संवर्धनाकरीता आर्थिक मदत देण्याचे स्वातंत्र्य, कलम २८- विवक्षित शैक्षणिक संस्थात धार्मिक कार्यक्रम वा उपासना करण्याचे स्वातंत्र्य, कलम २९- सांस्कृतिक व शैक्षणिक हक्कांचे अल्पसंख्याकदृष्ट्या संरक्षण, कलम ३०- अल्पसंख्याक वर्गास शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांच्या प्रशासनाचा हक्क.याशिवाय महत्त्वपूर्ण बाब म्हणजे महामानव बसवण्णा यांचा जयंती उत्सव संपूर्ण जगात एकाच दिवशी साजरा व्हावा यासाठी सरकारने संशोधन समिती नियुक्त करावी. बसवण्णा यांची जन्म तारीख आणि महालिंगैक्य तारीख अधिकृतपणे घोषित करावी व त्या ऐतिहासिक नोंदी शासन प्रसारित बसवण्णांच्या फोटोखाली मुद्रित कराव्यात. अशी मागणी जाणकार लिंगायत बांधव व भगिनींनी केंद्र आणि राज्य सरकारकडे आग्रहाने परंतु लिंगायत विचारधारेच्या वैचारिक संघटनेच्या माध्यमातून करणे आवश्यक आहे. हे मौलिक कार्य आपण हाती घ्यावे आणि पूर्ण करावे. ही विनंती . धन्यवाद।

१) शितल खाडे, सांगली क्र.- ९४०३५७३१५०

२) शशिकांत उरगुंडे,लातूर क्र.- ७०२०३८१९९३

## पान एक वरून

**गर्दीचा फायदा घेत गंठण चोरी**

गुन्हे शाखेला दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि. स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांच्या नेतृत्वाखाली पथकाने तपास सुरु केला असता गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीवरून शालनबाई लक्ष्मण जाधव (वय ५८) व केसरबाई सुखदेव जाधव (वय ५३, दोघी रा. गांधीनगर, पेठ बीड) या दोन महिलांना नाळवंडी नाका, बीड येथे ताब्यात घेण्यात आले.तपासादरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून, त्यांच्याकडून १) दोन तोळ्यांचे सोन्याचे गंठण व २) अडीच तोळ्यांची सोन्याची चैन असा एकूण साडेचार तोळे वजनाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. सदर आरोपींना पुढील तपासासाठी परळी शहर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास परळी शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी व अमंलदार करत आहेत. ही यशस्वी कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर व मा. पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पो. उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोह. मारुती कांबळे, पोह. बाळकृष्ण जायभाये, पोह. विकास राठोड, मपोह. सुशिला हजारे, मपोह. स्वाती मुंडे, पोकों. नारायण कोरडे, पोकों. सचिन आंधळे व चा. पोकों. नितीन वडमारे (सर्व स्थानिक गुन्हे शाखा, बीड) यांनी केली आहे.

**देशमुख हत्या प्रकरणात आमचा कुठेही**

विरोधात खटला सुरु आहे. आजच्या सुनावणीत वाल्मीक कराड आणि विष्णू चाटे यांनी दाखल केलेल्या डिस्चार्ज अर्जावर सरकारी पक्षाने आपली बाजू मांडली. मात्र, या खटल्यातील मूळ फिर्यादीचा जबाब अद्याप सादर न झाल्याने न्यायालयाने पुढील सुनावणीसाठी मुदत दिली.वाल्मीक कराड यांचे वकील अॅड. विकास खाडे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, या प्रकरणात अजून आरोप निश्चितीची प्रक्रिया सुरू झालेली नाही. सध्या डिस्चार्ज अर्जांवरील युक्तिवाद सुरु असून, त्यानंतर कोर्ट निर्णय घेईल. त्यानंतरच आरोप निश्चितीच्या टप्प्यावर येऊ.दस्तावेज व पुरावे अद्यापही अपूर्ण: अॅड. खाडे यांनी यावेळी हेही स्पष्ट केले की, प्रकरणाशी संबंधित काही दस्तावेज आणि डिजिटल पुरावे अजूनही सर्व आरोपींना मिळालेले नाहीत. त्यामुळे न्यायालयाने सुनावणी पुढे ढकलली आहे. तसेच, प्रथमदर्शनी आमच्या अशिलांचा या हत्याकांडाशी काहीही संबंध नाही, असा युक्तिवाद त्यांनी कोर्टात केला. दरम्यान, विष्णू चाटे याला बीड कारागृहात हलवण्याच्या मागणीवरही आज सुनावणी झाली. यावेळी कारागृह अधीक्षक आणि सरकारी वकिलांनी आपली भूमिका स्पष्ट केली असून, आता न्यायालयाच्या निर्णयाची प्रतीक्षा आहे.

**अटारी-वाघा बॉर्डरवर रिट्रीट**

आणि सदकी येथे रिट्रीट समारंभात बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला. सीमा सुरक्षा दलाच्या पंजाब फ्रंटियरने दिलेल्या माहितीनुसार अटारी-वाघा सीमेवर रिट्रीट सेरेमनी दरम्यान भारतीय गार्ड कमांडर आणि पाकिस्तानी गार्ड कमांडर यांच्यात प्रतीकात्मक हस्तांदोलनाची परंपरा बंद केली जाईल. याशिवाय, कार्यक्रमादरम्यान दरवाजे देखील बंद राहतील. पहलगाममधील अलिकडच्याच दु:खद हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, पंजाबमधील अटारी, हुसैनीवाला आणि सदकी येथे रिट्रीट सेरेमनीच्या वेळी होणा-या समारंभ मर्यादित स्वरुपाचा करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असे पंजाब फ्रंटियरने सांगितले.त्यानुसार संध्याकाळी अटारी-वाघा सीमेवर दररोज होणा-या रिट्रीट सेरेमनीमध्ये बदल दिसून आला. नेहमी बीएसएफ आणि पाक रेंजर्सच्या जवानांमध्ये औपचारिक हस्तांदोलन होते. परंतु यावेळी ना दरवाजे उघडले गेले आणि ना हस्तांदोलन झाले. अटारी सीमेवर झालेल्या रिट्रीट सेरेमनीमध्ये दोन्ही देशांचे दरवाजे उघडले गेले नाहीत. दोन्ही देशांचे झेंडे बंद दरवाज्यांमध्ये खाली उतरवण्यात आले. बीएसएफ जवानांनी पाक रेंजर्सशी हात मिळवले नाहीत. तसेच आजच्या समारंभात लोकांची संख्याही कमी होती. याधी दररोज सुमारे २० हजार लोक उपस्थित असत. मात्र आज केवळ १० हजार लोक उपस्थित होते.दरम्यान, २६ लोकांच्या मृत्यूनंतर भारत सरकारने पाकिस्तानविरुद्ध कडक पावले उचलली आहेत. यामध्ये पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत देश सोडण्यास सांगितले. त्यानुसार आज १०५ भारतीय पाकिस्तानातून भारतात परतले. तर २८ पाकिस्तानी नागरिक पाकिस्तानात परतले आहेत. पाकिस्तानी नागरिकांना दिले जाणारे वैद्यकीय व्हिसा फक्त २९ एप्रिल पर्यंत वैध असतील. देशात असलेल्या सर्व पाकिस्तानी नागरिकांना व्हिसा कालावधी संपण्यापूर्वी भारत सोडावा लागणार आहे.




बीडः २३ एप्रिल २०२५ रोजी रात्री ७ वाजता बीड शहरात हिंदू-मुस्लिम बांधवांच्या वतीने एकत्र येत जातीय सलोखा कँडल मार्च काढण्यात आला. या वेळी उपस्थित सर्व धर्मीय नागरिकांनी काश्मीर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा जाहीर निषेध करत हल्ल्यात मृत्यू झालेल्या निरपराध बांधवांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. सर्वधर्मीय ऐक्याचे प्रतिक ठरलेला हा कँडल मार्च सामाजिक सलोख्याचा संदेश देणारा ठरला.

## पान सहा वरून

**कलाकेंद्रावर पोलिसांची**

१४३ अंतर्गत कला केंद्राच्या मालकाविरुद्ध, मालकाचा मुलगा (जो प्रतिष्ठान चालवत होता) आणि संबंधित व्यवस्थापकाविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे.कठोर कलमे लावली गेली आहेत आणि त्यात सहभागी असलेल्या सर्वांवर गुन्हा दाखल करणार आहेत.

**साहित्याभूषण पुरस्कार**

अनेक काव्य कट्टे, परिषदा, चर्चासत्रे, संमेलने तसेच एकंदरीत मराठी साहित्य चळवळीतील त्यांचे योगदान बहुमूल्य असून युवकांना या क्षेत्रात रोजगार कसा उभा करायचा याचा योग्य मार्ग त्यांनी दिला आहे. कवी, लेखक, प्रकाशक, संपादक ते साहित्य चळवळ नव्याने चालू ठेवणारा एक सर्वसमावेशक कार्यकर्ता अशी त्यांची ओळख आहे. साहित्य चळवळीतील त्यांच्या व्यापक योगदानाबद्दल हा पुरस्कार विक्रम शिंदे यांना जाहीर झाला असल्याची माहिती अखिल भारतीय मराठी स्वाभिमानी संघर्ष सेनेचे संस्थापक अध्यक्ष पिराजी थोरवडे आणि संयोजक लेखक सत्यवान मंडलिक यांनी दिली.

**परळीत महात्मा बसवण्णांची**

इटके, नितीन स्वामी, अश्विन मोगरकर, दत्ता शिवगण, ड. रमेश आप्पा साखरे हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत.लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवन येथे आयोजित या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक भगवान साकसमुद्रे, रानबा गायकवाड, आकाश देवरे व नितीन ढाकणे यांनी केले आहे.

**केज बसडेपोसाठी**

विकास मिरगणे, इंजिनिअर मोहनराव कराड, रामहरी कोल्हे, ऑनकॅप्टन अनिल सपाटे, आदेश देशमुख, पत्रकार श्रावणकुमार जाधव, पत्रकार मुब्बस्सीर खतीब, राहुल खोडसे, रोहित कसबे, गोपीनाथ इनकर यांच्यासह नागरिकांनी सहभाग नोंदवला.

**केज वनविभाग झोपले**

सारूकवाडी व केवड या गावातील झाडे तोडत आहेत. हे लाकडे ट्रक्टर ट्रॉलीत ,ट्रेक मध्ये भरुन बीडच्या मिलला , सायंकाळी या ट्रेक सर्रास शहरात आणल्या जातात तरी सुद्धा वनविभाग पदाधिकारी कोणतीही चौकशी न करता या लाकडाची कटाई करून देतात, अशी माहिती मिळाली आहे. चिंचोली माळी परिसरातील वृक्षाचे रक्षण करणे व अवैध वृक्षतोड थांबवणे, अवैध लाकूड वाहतुकीवर कारवाई करणे वनविभाग व पोलिस यांच्याकडून अपेक्षित आहे. या दोन्ही विभागांचे दुर्लक्ष होत आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**चराई अनुदान थेट बँक**

व शेळी विकास महामंडळामार्फत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आलेले असून त्यामध्ये लॉटरी पद्धतीने संगणकीय प्रणालीद्वारे त्यांची निवड यादी तयार करण्यात आलेली होती. जिल्हा व तालुका निहाय धनगर व तत्सम मेंढपाळांची संख्या विचारात घेऊन जिल्हा व तालुका निहाय लक्षांक देण्यात आलेले होते. त्यामधून पात्र मेंढपाळ कुटुंबाना माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीसाठी प्रति माह ६ हजार रुपये असे एकूण २४ हजार रुपये चराई अनुदान देण्यात आले आहे. चराई अनुदान मिळाल्यामुळे मेंढपाळ कुटुंबाना त्यांच्या मेंढ्याकरिता चारा उपलब्ध झाल्याने मेंढ्यांच्या आरोग्यामध्ये सुधारणा होऊन मेंढपाळाच्या आर्थिक उत्पन्नामध्ये भर पडत आहे. या योजनेद्वारे राज्यामधील ३०५४ लाभार्थीना रु. ७.३३ कोटी अनुदान थेट लाभधारक हस्तांतरण (उ्रइढ) द्वारे लाभार्थीच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## भारतीय शिक्षण मंडळाचा ५६ वा स्थापना दिवस साजरा

**कल्याण :** समाजासाठी शिक्षणाचा उपयोग झाला पाहिजे, शिक्षणामुळे स्वतःचा शोध घेणे सुलभ होते, आपल्या शिक्षणाने राष्ट्रीय कार्यात योगदान देता आले पाहिजे असे मत अखिल भारतीय कार्यकारी अध्यक्ष डॉ. सुहास पेडणेकर यांनी येथे व्यक्त केले. भारतीय शिक्षण मंडळाचा ५६ वा स्थापना दिवस पूर्वेकडील बाबा बोरसे महाविद्यालय येथे नुकताच साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या पेडणेकर यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. यावेळी, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आर. के. शिक्षण प्रसार मंडळाचे अध्यक्ष डॉ. दौलत सिंह पालीवाल उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात हीना पुरोहित यांनी सादर केलेल्या ध्येय मंत्र आणि ध्येय श्लोकाने झाली. पाहुण्यांचे स्वागत प्रा. विजयेंद्र सिंघम यांनी तर प्रास्ताविक प्रा. जितेंद्र महाजन, सूत्रसंचालन संयोजक उमाकांत चौधरी यांनी केले. कोणतीही वेळ आली असता घाबरून न जाता त्या वेळेला सामोरे जात लढण्याचा सल्ला देत प्रत्येक काम वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे असे डॉ. पालीवाल यांनी उपस्थितांना सांगितले.

# दहशतवादी हल्ला डोंबिवलीसाठी काळा दिवस

## डोंबिवलीतील तिघांची ठरली शेवटची ट्रीप



◆ **डोंबिवली (वार्ताहर):**

काश्मीरच्या पहलगाम येथील बैसरन येथे मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ला डोंबिवलीसाठी एक काळा दिवस ठरला आहे. या भ्याड हल्ल्यात डोंबिवलीतील तीन तरुणांचा मृत्यू झाला असून, त्यांच्यासोबत गेलेल्या कुटुंबीयांनी मृत्यूला डोळ्यांसमोर पाहिले. या हल्ल्यात डोंबिवलीतील संजय लक्ष्मण लेले (वय ५२), हेमंत जोशी (वय ४३) आणि अतुल मोने (वय ४४) यांचा मृत्यू झाला आहे.

संबंधित अंत्यविधीच्या पार्श्वभूमीवर प्रशासन सज्ज झाले असून पालिकेने मृतांच्या परिसरातील रस्ते स्वच्छ केले आहेत. तसेच, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी डोंबिवली वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील यांनी वाहतूक पोलीस व सेवक यांना योग्य सूचना दिल्या आहेत. भाजपा प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण, आमदार राजेश मोरे यांच्यासह अनेक विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि डोंबिवलीकर नागरिकांनी तिघांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. अंत्ययात्रा भागशाळा डोंबिवली पश्चिम येथील मैदानातून सुरू होऊन कोपर उड्डाणपूलावरून मुक्षधाम येथे आली. याठिकाणी सुद्धा बराच मोठा समूदाय सात वाजल्यापासून जमला होता. आश्रुनयनांनी तिघांना निरोप देण्यात आला.

### ठाण्यातील ३७ पर्यटक सुरक्षित

या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर जम्मू-काश्मिर येथे सुरक्षित असणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील पर्यटकांची यादी मिळाली आहे. बुधवार, दि. २३ एप्रिल रोजी दुपारी २ वाजेपर्यंत मिळालेली ही माहिती आहे. अनुष्का मोने (३५ वर्षे), ऋचा मोने (१८ वर्षे), मोनिका जोशी (४५ वर्षे), ध्रुव जोशी (१६ वर्षे), कविता लेले (४६ वर्षे), हर्षल लेले (२० वर्षे), भुषण अशोक गोळे (३९ वर्षे), ज्योती अशोक गोळे (३६ वर्षे), आरव भुषण गोळे (८ वर्षे), विनोद विश्वास गोळे (४१ वर्षे), माधुरी विनोद गोळे (४१ वर्षे), विहान विनोद गोळे (११ वर्षे), स्वाती विश्वास गोळे (३६ वर्षे), अतुल प्रकाश सोनवणे (४२ वर्षे), प्रियंका अतुल सोनवणे (३४ वर्षे), अनन्या अतुल सोनवणे (१२ वर्षे), अर्णव अतुल सोनवणे (८ वर्षे), नंदकुमार म्हात्रे (६५ वर्षे), निलिमा म्हात्रे (६५ वर्षे), निशांक म्हात्रे (३१ वर्षे), प्रमदा पाटील (३० वर्षे), सुजन पाटील (६३ वर्षे), आशा पाटील (६० वर्षे), नेहा ठाकूर (३५ वर्षे), मनोज ठाकूर (३९ वर्षे), विहान ठाकुर (७ वर्षे), संजय म्हात्रे (५८ वर्षे), स्वाती म्हात्रे (४९ वर्षे), नेत्रा भूषण पांगेरकर (३७ वर्षे), भूषण इंद्रनाथ पांगेरकर (४० वर्षे), इंद्रायणी इंद्रनाथ पांगेरकर (६५ वर्षे), श्लोक भूषण पांगेरकर (१२ वर्षे), विहान देवेन ढोलम (५ वर्षे), गौरव सांगळे (३७ वर्षे), दिपाली सांगळे (३५ वर्षे), स्वाती सांगळे (४० वर्षे), वेद सांगळे (७ वर्षे), शुभ क्षीरसागर (१० वर्षे), मनाली प्रणय ठाकूर (२८ वर्षे), प्रणय ठाकूर (२९ वर्षे).

### पर्यटक मायभूमीत परतण्यासाठी आग्रही

हल्ल्याच्या घटनेनंतर सर्वच पर्यटक मायभूमीत परतण्यासाठी आग्रही आहेत. या पर्यटकांच्या मदतीसाठी शिवसेनेची एक टीम उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आणि कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीनगर येथे बुधवारी सकाळीच पोहोचली. त्यांनी सर्वांना धीर दिला. मानसिक आधाराने सर्वच पर्यटक सुखावले. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील ६९ पर्यटकांची परतीच्या प्रवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. यावेळी हॉटेलमध्ये थांबलेल्या पर्यटकांशी खासदार डॉ. शिंदे यांचे स्वीय सहाय्यक अभिजित दरेकर यांच्या माध्यमातून पर्यटकांना दिलासा दिला.

**हेल्पलाईन क्रमांक जारी :** या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने नागरिकांना आवाहन केले आहे की, पहलगाम येथे आपल्या जिल्ह्यातील कोणी व्यक्ती असल्यास किंवा आपल्या ओळखीतील कोणी नातेवाईक किंवा व्यक्ती असल्यास त्याची माहिती तत्काळ ९३७२३३८८२७ आणि ७३०४६७३१०५ या क्रमांकांवर जिल्हा प्रशासनास कळवावी.




## १८ वा आंबा महोत्सव १ मेपासून

# ठाणेकरांना वाजवी दरात मिळणार दर्जेदार हापूस

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

चोखंदळ आणि खवय्या ठाणेकरांचे लक्ष लागून राहिलेला १८ वा आंबा महोत्सव येत्या १ मे पासून सुरू होत आहे. आमदार संजय केळकर यांची संस्कार सेवाभावी संस्था आणि कोकण विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या आंबा महोत्सवाला महाराष्ट्र शासनाच्या कृषी पणन मंडळाने पुरस्कृत केले आहे.

१ ते १२ मे या कालावधीत ठाण्याच्या गावदेवी मैदानात शेतकरी ते ग्राहक अशी थेट विक्री व्यवस्था असणाऱ्या या आंबा महोत्सवात, कोकणातील अस्सल हापूस, पायरी, रत्ना, केसर आंब्याबरोबरच, आंबा-फणस पोळी, सरबते, काजू, मालवणी मसाले, पापड अशा विविध दर्जेदार कोकणी उत्पादनांचे ४५ स्टॉल्स असणार आहेत.

हा केवळ बाजार नसून शेतकरी आणि ग्राहकांना दिलासा देणारी एक चळवळ आहे. या महोत्सवात धान्याचे ५ स्टॉल असणार असून महिला बचत गटांचे देखील ५ स्टॉल असणार आहेत. शेतकऱ्यांना हात देताना सर्वसामान्य ठाणेकरांनाही दर्जेदार हापूस आंबा विकत घेऊन त्याचा आस्वाद घेता यावा, यासाठी ही चळवळ गेली १८ वर्षे सुरू असल्याची माहिती संस्कार संस्थेचे अध्यक्ष व महोत्सवाचे आयोजक आमदार संजय केळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी कोकण पदवीधर मतदार संघातील आमदार निरंजन डावखरे, भाजपा ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले, माजी उपमाहापौर अशोक भोईर, सुभाष काळे, कोकण विकास प्रतिष्ठानचे राजेंद्र तावडे, परिवहन सदस्य विकास पाटील, ठाणे जिल्हा हाउसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे, संतोष साळुंखे, विष्णू रानडे उपस्थित होते.

यावर्षी अवेळी पडलेला पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे फळगळ झाली व थ्रीप्स रोग, तुडतुडा किटकांच्या प्रादुर्भावामुळे तीस टक्केच आंबा पीक हाती लागले आहे. त्यामुळे मागील दहा वर्षांपासून सातत्याने कोकणातील शेतकरी आर्थिक संकटात आहे. या साऱ्या परिस्थितीचा जाणकार ठाणेकर सहानुभूतीने विचार करेल व वाजवी दरातील दर्जेदार आंबा जास्तीत जास्त खरेदी करून कोकणातील शेतकऱ्यांना पाठबळ देईल, असा विश्वास आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केला.

### देशभर १२६ कोटींची आंबा विक्री

कोकणातील एकुण १,८०,००० हेक्टर जमिनीवर आंब्याची लागवड केली जाते. २०२२ साली कोकणातील आंब्याचे उत्पादन ३,२०,००० मेट्रीक टन होते. यातील २६० कोटी रुपयांची आंब्याची विक्री मुंबई व भारतभर केली गेली आणि १०० कोटी रुपयांचा आंबा निर्यात केला गेला. दरवर्षी हे उत्पादन घटत जाऊन २०२३ मध्ये २,५६,००० मेट्रीक टन आणि २०२४ मध्ये १,२८,००० मेट्रीक टन झाले असून १२६ कोटी रुपयांची आंबा विक्री देशभर केली गेली आणि ५४ कोटी रुपयांचा आंबा निर्यात केला गेला.

## वेचक

### ठाण्यात २४ तास पाणीपुरवठा बंद

**ठाणे (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जांभूळ जलशुद्धीकरण केंद्रात अत्यंत महत्त्वाचे देखभाल आणि दुरुस्तीचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे, कटाई नाका ते ठाणे या दरम्यान गुरुवार दि. २४ एप्रिल रोजी रात्री १२.०० वाजल्यापासून ते शुक्रवार दि.२५ एप्रिल रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत एकूण २४ तासांसाठी



पाणीपुरवठा बंद राहणार आहे. परिणामी, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात, दिवा, मुंब्रा (प्रभाग क्र. २६ व ३१ चा काही भाग वगळून) आणि कळवा प्रभाग समितीमधील सर्व भागांमध्ये, वागळे प्रभाग समितीमधील रुपादेवी पाडा, किसन नगर नं. २, नेहरू नगर तसेच माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीअंतर्गत कोलशेत खालचा गाव येथील पाणीपुरवठा २४ तासांसाठी पूर्णपणे बंद राहील. तसेच, पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होईल, याची कृपया नागरिकांनी नोंद घ्यावी. या पाणी कपातीच्या कालावधीत पाणी काटकसरीने वापरून सहकार्य करावे, आवाहन ठाणे महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

### मुरबाड बस आगारात नवीन पाच बसेस दाखल



**मुरबाड :** तालुक्यातील ग्रामीण भागात तसेच आदिवासी पट्ट्यातील प्रवाशांना जुन्या व भंगार बस गाड्यामधून गेले अनेक दिवस प्रवास करावा लागत होता. या जुन्या बस गाड्यांचे अनेक वेळा अपघातही झाले आहेत. या संदर्भात अनेक वेळा प्रसार माध्यमातून आवाज देखील उठवण्यात आला होता. मुरबाड विधानसभेचे स्थानिक आमदार किसन कथोरे हे मुरबाडकरांसाठी १० नवीन बसेस मिळवण्यासाठी शासनदरबारी प्रयत्नशील होते. ठाणे वाहतूक नियंत्रक सागर पळसुळे यांचाही पाठपुरावा सुरू होता. अखेर सर्वांच्या प्रयत्नांना यश येऊन मुरबाड बस आगारासाठी नवीन ५ बसेस महामंडळाकडून देण्यात आल्या आहेत. उर्वरित ५ बसेस सुद्धा लवकरच मिळतील असे आश्वासन आमदार कथोरे यांनी दिले आहेत. या नवीन बसेसचे लोकार्पण बुधवारी माजी जिल्हा परिषद सदस्य उल्हास बांगर, मुरबाड नगरपंचायतचे नगराध्यक्ष संतोष चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले.

### मानिवली येथे नवीन नळपाणी योजनेचे लोकार्पण

**मुरबाड :** तालुक्यातील साखरपाडा मानिवली (गोंधळी) येथे नवीन नळपाणी योजनेचा लोकार्पण सोहळा नुकताच ठाणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुभाष पवार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी सरपंच बळीराम आगविले, चिंतामण महाराज गोंधळी, बाळू बाबरे, बबन कराले, चेतन गोळे, संतोष भांडे, शिवाजी भांडे, सरपंच वसंत गोंधळी, मुकुंद धुमाळ, अशोक गोंधळी, जयराम गोंधळी, गुरुनाथ वारघडे, लहू गोंधळी, आदी ग्रामस्थ उपस्थित होते.



## हल्ल्याविरोधात शिवसेना कल्याण शहर शाखेतर्फे तीव्र निदर्शने

◆ **कल्याण (वार्ताहर) :**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे काही पर्यटकांवर भ्याड दहशदवादी हल्ला झाला. या अमानवी कृत्यात २७ पेक्षा जास्त निष्पाप पर्यटक नागरिकांनी आपला जीव गमावला. बुधवारी शिवसेना कल्याण शहर शाखेच्या वतीने शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील यांच्या नेत्तृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे एकत्र येत जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हत्येच्या निषेधार्थ तीव्र आंदोलन करण्यात आले. या भ्याड आणि अमानवी हल्ल्याच्या निषेधार्थ शिवसेना कल्याण शहर शाखेच्या वतीने झालेल्या आंदोलनात, कार्यकर्त्यांनी निषेध फलक घेऊन, घोषणाबाजी करत देशाच्या सुरक्षेसाठी कटीबद्ध असल्याचा निर्धार व्यक्त केला.




या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या सर्व नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. देशाच्या सुरक्षेसाठी केंद्र सरकार सक्षम असून, अशा घटनांचा कणखरपणे प्रतिकार केला जाईल असे रवी पाटील यांनी सांगितले. यावेळी उपनेत्या विजया पोटे, जिल्हासंघटक छाया वाघमारे, उपजिल्हा संघटक नितू कोटक, विधानसभा संघटक प्रभुनाथ भोईर, संजय पाटील, सहसंघटक गणेश जाधव, विधानसभा समन्वयक श्रेयस समेळ, महिला शहर संघटक नेत्रा उगले, उपशहर प्रमुख सुनील वायले, सुनील खारूक, नितीन माने, माजी नगरसेवक जयवंत भोईर, युवा सेना उपशहरप्रमुख अनिरुद्ध पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी,महिला आघाडी आणि कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले.

## सगनाई देवी मंदिराचे शांततापूर्ण स्थलांतर

◆ **मीरा-भाईंदर (प्रतिनिधी) :**

मीरा-भाईंदर महापालिका प्रभाग समिती क्रमांक ४ अंतर्गत मंगळवारी दि. २२ रोजी घोडबंदर गाव येथील सगनाई देवीचे मंदिर हे नागरिकांच्या सहकार्याने व विधिपूर्वक नवीन जागी स्थलांतरित करण्यात आले. वेस्टर्न हॉटेल ते घोडबंदर गाव परिसरात वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत रस्ता रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामाच्या आनुषंगाने मंदिराच्या स्थलांतराची आवश्यकता निर्माण झाली होती.



मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार व नॅशनल हायवे ऑथॉरिटीच्या पत्रव्यवहारानंतर, महापालिकेच्या विविध विभागांनी समन्वयाने ही कारवाई यशस्वीरीत्या पूर्ण केली. या कारवाईस अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (अतिक्रमण) कल्पिता पिंपळे, पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड, पोलीस वरिष्ठ निरीक्षक, महापालिकेचे सहाय्यक आयुक्त, अतिक्रमण विभागप्रमुख, पोलिस पथक, कर्मचारी, फेरीवाला पथक आणि महाराष्ट्र सुरक्षा बल जवान यांनी आपली उपस्थिती व जबाबदारी निभावली. या संपूर्ण प्रक्रियेत घोडबंदर गावातील ग्रामस्थ तथा मीरा-भाईंदर महापालिकेचे माजी उपमहापौर चंद्रकांत वैती, पदाधिकारी केशव घरत, रणजीत किणी यांच्या नेतृत्वाखाली, स्थानिक नागरिक आणि मंदिर व्यवस्थापन समिती यांनी मीरा-भाईंदर महापालिका आणि पोलीस प्रशासनास शांततापूर्ण सहकार्य केले.

### बेकायदेशीर वाहनांवर होणार कारवाई

**भिवंडी (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३० व कलम २३१ नुसार महानगरपालिका आयुक्तांना महापालिका क्षेत्रातील रस्त्यावर वा पदपथावर ठेवण्यात आलेली वाहने नोटीस न देता काढून टाकण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. भिवंडी निजामपुर शहर महापालिका हद्दीतील बेकायदेशीरपणे सोडून दिलेली वाहने/बेवारस वाहनांवर महाराष्ट्र प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २३०, २३१ व प्रकरण २७ कलम ४३९ अन्वये कारवाई करणे व दंड आकारणे व वाहन मालकाने वाहन घेऊन न गेल्यास बेवारस वाहनांचा लिलाव करणे कामी प्रशासकीय ठराव क्र. ७८० दि.१७ एप्रिल रोजी ठराव पारीत करण्यात आला. त्यानुसार भिवंडी निजामपूर शहर पालिकेमार्फत महापालिका हद्दीतील बेकायदेशीरपणे सोडून दिलेली वाहने/बेवारस वाहने हटविण्याबाबत मोहिम राबविण्यात येत आहे.

### रवी गीते कोकण विभागीय माहिती उपसंचालकपदी



**नवी मुंबई :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील वरिष्ठ अधिकारी रवी गीते यांनी बुधवार, दि. २३ रोजी कोकण विभागीय माहिती उपसंचालक पदाचा कार्यभार स्वीकारला. नवी मुंबईतील कोकण भवन येथे आयोजित कार्यक्रमात प्रभारी उपसंचालक अर्चना शंभरकर यांच्याकडून त्यांनी पदाचा कार्यभार स्वीकारला. यावेळी ठाण्याचे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, कोंकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष मनोज जालनावाला, सहायक संचालक संजिविनी जाधव-पाटील आदी कर्मचारी उपस्थित होते.

## महापालिकेची पाण्याची टाकी धोकादायक अवस्थेत

◆ **भाईंदर (वार्ताहर) :**

मीरा रोड येथील महाजन वाडी परिसरात असलेली पाणी साठविण्याची उंच टाकी धोकादायक अवस्थेत असल्याची तक्रार परिसरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी महापालिकेकडे केली आहे. मीरा भाईंदर शहराला शहाड टेमघर पाणीपुरवठा योजना आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्यामार्फत पाणीपुरवठा होत आहे. पाणी साठविण्यासाठी महापालिकेने शहरात उंच टाक्या बांधलेल्या आहेत. परिसरातील लोकसंख्येच्या दृष्टीने त्यांची पाणी साठविण्याची क्षमता आहे. महाजन वाडी भागातील पाण्याच्या उंच टाकीत २० दशलक्ष लिटर्स पाणी साठ्याची क्षमता आहे. टाकी भरल्यावर पाणी वाहून जात असल्याने टाकीच्या खालील भाग खचला असून कधीही दुर्घटना होण्याची शक्यता असल्याची तक्रार समाजसेवक नरेंद्र उपरकर यांनी महापालिकेकडे केली. त्यानुसार पालिका अधिकाऱ्यांनी या टाकीची पाहणी केली असून योग्य ती दुरुस्ती करण्यात येईल असे सांगण्यात आले.

> सदर टाकी जमिनीच्या आत १५ मीटर खोल खणून तयार केली आहे. टाकीला कोणताही धोका नाही. वाहून गेलेल्या पाण्यामुळे संरक्षक कुंपणाचा भाग खराब झाला आहे, संरक्षक भिंत नव्याने डिझाईन करून तयार केली जाईल.
> - **शरद नानेगावकर,** कार्यकारी अभियंता.

## 'उल्हास नदीच्या पाण्याची तपासणी करण्याची मागणी'

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

उल्हास नदी साफसफाई करत असताना तसेच जलपर्णी व गाळ काढण्याच्या कामामुळे कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीत आणि उल्हासनगर महापालिका हद्दीत नळातून पिण्याचे पाणी पिवळ्या रंगाचे येत होते. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला हे पाणी पिऊन धोका निर्माण होऊ नये यासाठी या पाण्याची लॅबोरेटरीमध्ये तपासणी करण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

हल्लीच कल्याण-डोंबिवली महापालिका प्रशासनाच्या निरीक्षणाखाली मोहने आंबिवली येथील उल्हास नदीची साफसफाई मोहीम हाती घेण्यात आली आहे. या नदीची साफसफाई करण्याचा उद्देश चांगला व जनहिताचा आहे. परंतु या नदीतून जलपर्णी व गाळ काढत असताना तिथले संपूर्ण पाणी गढूळ होत आहे.

## वाढत्या उष्म्याच्या तडाख्यामुळे ठाणेकर हैराण

# उन्हाळ्यात डोळ्यांचे विकार होण्याचा धोका !

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

उष्म्याने ठाणेकर भलतेच हैराण झाले असून, एप्रिल महिन्यात उन्हाचा तडाखा वाढत चालला आहे. तापमान ४० अंशांवर पोहोचलेले असताना, डोळ्यांचा त्रास वाढतो आहे. ठाण्याच्या सिव्हिल रुग्णालयातील नेत्र विभागात डोळ्यांच्या तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांबरोबर उन्हाच्या तीव्रतेमुळे डोळे कोरडे पडणे, खाज येणे, जळजळ, सूज येणे किंवा सतत पाणी असे रुग्ण उपचारासाठी येत आहेत.

### उन्हाळ्यात होणारे सामान्य डोळ्यांचे त्रास

जळजळ व लालसरपणा, उष्णतेमुळे डोळे कोरडे व अस्वस्थ होतात.
कंजंक्टिव्हायटिस: संसर्गजन्य आजार वाढत असून, डोळ्यांत सूज व पाणी येणे यासारखी लक्षणं दिसत आहेत. प्रकाश संवेदनशीलता (फोटोफोबिया): उन्हामुळे प्रकाश सहन न होणे, डोळ्यांतून पाणी येणे ही लक्षणं दिसतात.
उन्हात फिरताना डोळ्यांच्या सुरक्षेसाठी चांगल्या सनग्लासेस वापरा
डोळ्यांना चोळू नका: अस्वस्थता वाटल्यास स्वच्छ कपड्याने सौम्यपणे पुसा, टोपी किंवा छत्री वापरा, डिजिटल स्क्रीनपासून २० फूट लांबून बघा, सतत मोबाईल बघू नका, पुरेसे पाणी पिणे आवश्यक आहे.



ठाण्यामध्ये उन्हाळ्यात एरवी कमाल तापमान ३४ ते ३५ अंश सेल्सिअस असत. मात्र गेल्या काही वर्षात तापमानात वाढ झाली आहे. दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे नकोसे वाटत. अशातच उन्हात जास्त फिरल्यामुळे चक्कर येणे, पोटात मळमळ डी हायड्रेशन सारख्या बाबींबरोबर डोळ्यांचा त्रास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे डोळ्यांची विशेष काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

> "उन्हाळ्यात डोळ्यांची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. दिवसातून किमान दोन वेळा थंड पाण्याने डोळे धुतले पाहिजे. डोळ्यांचा त्रास अधिक जाणवत असेल तर कोणताही घरगुती उपाय न करता रुग्णालयात नेत्र चिकित्सकांना डोळे दाखवावेत.
> - **डॉ. शुभांगी अंबाडेकर** (नेत्र तज्ज्ञ सिव्हिल रुग्णालय)

सिव्हिल रुग्णालयाच्या नेत्र विभागात उन्हामुळे डोळे सुजणे, लाल होणे, डोळ्यांतून पाणी येणे, सूज आलेल्या रुग्णांवर उपचार केले जात असल्याची माहिती नेत्र तज्ज्ञ डॉ. शुभांगी अंबाडेकर यांनी दिली.





## विद्यार्थ्यांची रॅलीमार्फत वसुंधरा संवर्धनाची जनजागृती

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

शासनाने निर्धारित केलेल्या २२ एप्रिल ते १ मे या कालावधीत 'पर्यावरण वाचवा-वसुंधरा सजवा' या ब्रीदवाक्यानुसार महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार शिक्षण विभागाने विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात केलेली आहे. यामध्ये लोकसहभागावर भर देण्याच्या अनुषंगाने नवी मुंबईचे भविष्य असणाऱ्या उदयोन्मुख पिढीच्या मनावर निसर्ग रक्षणाची मूल्ये रूजविण्यासाठी विद्यार्थ्यांना या मोहिमेत सहभागी करून घेतले जात आहे. जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधत महापालिका क्षेत्रातील ४३४ प्राथमिक शाळांमध्ये प्रभात फेरीच्या स्वरूपात राबविण्यात आला. ज्यामध्ये दीड लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभागी होत आपापल्या शाळा परिसरात वसुंधरा संरक्षण-संवर्धनाविषयी व्यापक जनजागृती केली.

# अवधानाची ओंजळ



**श्री गुरुगाथा**



**अरविन्द दोडे**

**तव इये शब्दकुपिकेतळी |**
**नोडवेचि अवधानाची अंजुळी |**
**जे नावेक अर्जुन तये वेळी |**
**मागाचि होता ॥७.१८५॥**

देवाच्या सांगण्याकडे भक्ताचे लक्ष नसेल, तर गुरू त्याला श्रवणभक्ती शिकवतो! शब्दरूपी कुपीच्या खाली अर्जुनाची लक्षरूपी ओंजळ प्राप्त न झाल्याने ही अस्वस्थता आहे. अर्थरूपी रसदार फळं होती ती. वैराग्यगंगेच्या तीरावर वास करताना गुरुभक्तीच्या यज्ञाची समाप्ती कधी होत नाही. रोकडे स्वानुभवसौंदर्य लाभल्यावर निजबोधाचं प्रमेय सहज सुटते, पण हे गणित सुटण्यासाठी 'अवधानकला' शिकावी लागते. कोणतेही कार्य माणसाने करण्यासाठी देहमनाची पूर्ण तयारी म्हणजे अवधान! यात जाणिवेचे केंद्रीकरण होते. इष्ट विषय जाणिवेच्या केंद्रस्थानी आणला जातो. बोधक्षेत्रात मुख्य आकृती कोणती हे अवधानामुळे ठरते. याचे उदाहरण असे की, धावण्याच्या शर्यतीत स्पर्धकाचे लक्ष, धावण्याच्या सूचनेकडे असते. ती सूचना मध्यवर्ती आणि इतर बाबी सीमावर्ती किंवा गौण ठरतात.

अवधान आणि संवेदन या गोष्टी परस्परांशी संबंधित आहेत. पूर्वी अवधानाचा अभ्यास आत्मनिरीक्षणासाठी केला जात असे. आधुनिक काळात मानसशास्त्रज्ञांनी ही कला अधिक अभ्यासली. अवधानात मेंदूच्या अल्फा लहरींचे निरोधन होते. एका वेळी आपण अनेक कामं करतो. सवयीने ते जमते. ही कला जीवनोपयोगी आहे, म्हणून हा खुलासा. अवधान म्हणजे एकाग्रता!

कोणतीही विद्या असो, कला असो, एकाग्रतेशिवाय आत्मसात होणं अशक्यच. गुरूच्या सर्व गोष्टी समजून घेण्यासाठी एकाग्रता आवश्यक आहे.

**तदेजतिः तनैजति |**
**तद्दूरे तत्समीपके |**
**तदन्तरस्य सर्वस्य |**
**तदु सर्वस्य बाह्यतः ॥६२॥**

सर्वव्यापी गुरूचे हे वर्णन. स्थूल देह अमर होणे अशक्य. स्वतःच्या दिव्यत्वाचे स्मरण करणे म्हणजे सार्थकता. 'मी आत्मा आहे' हे समजून घेण्यासाठी गुरूचा अवतार. गुरुतत्त्व हे गतिशील. परिवर्तनशील नाही. गुरू दूर असतो. सर्वांतरी आहे, तसा बाह्यांतरीही आहे. जे शब्दात सांगता येत नाही, ते वेगळ्या भाषेत सांगतात. बुद्धीला चालना देतात. एका ठिकाणी आहे, म्हणजे तो सर्वत्र आहे. देवदर्शन झाल्यावर तीर्थक्षेत्री रोगी, भिकाऱ्यांना पाहून माणूस तिरस्कार करतो. शिव्या देतो. लोहार आपल्या कामात लोखंड बघतो. सोनार सोनं पाहतो. सुतार लाकडाची परीक्षा घेतो, तर शिंपी कापडाचा पोत निरखतो. कासार हात बघून बांगड्या भरतो, तर कसाई काय पाहतो, हे कळतं आपल्याला!

सागराचं पाणी, पाण्याच्या लाटा, लाटांवरील फेस यात समुद्रच असतो की नाही? कुंभार मातीच्या जाती ओळखतो. तसा साधकानं सर्वव्याप्त गुरू जाणावा! गुरू म्हणजे शिष्याची आत्मप्रभा, आत्मशक्ती होय.

**अपूर्वाणां परं नित्यं |**
**स्वयंज्योतिर्निरामयम् |**
**विरजं परमाकाशं |**
**ध्रुवभानंदमव्ययम् ॥६४॥**

आधीच्या श्लोकाशी या श्लोकाचा संबंध आहे. गुरू हाच साक्षात परब्रह्म आहे, हे पटवून देताना शिव म्हणतात, 'हे प्रिये! गुरूसारखा पूर्वी कुणी झालेला नसतो. गुरूसारखा फक्त गुरूच असतो.

एक कथा आठवते, अर्थात गुरू-शिष्यांचीच आहे. मित्रहो, तात्पर्य तुम्हीच काढा - एका शिष्यानं गुरूला विचारलं, "तुमचे गुरू कुठे आहेत? त्यांच्याकडे तुम्ही जात नाहीत, ते कधी इथे येत नाहीत, असे का?" गुरू हसून उत्तरले, "माझे अनेक गुरू आहेत."

"अनेक कसे? एकच असतो ना?"

"होय. पण त्यांना गुरू मानलंय मी!"

"एखादे नाव सांगा."

"चोर! त्याला मी गुरू मानले अन् प्रगती झाली साधनेच्या वाटेवर!"

"ती कशी? सगळी कथा सांगाल का?"

"सांगतो, ऐक! मी एकदा तीर्थयात्रा करत होतो. पायी चालता-चालता एका गावात पोहोचलो. डोक्यावर चंद्र पाहून लक्षात आले, मध्यरात्र झालीय. गावात सामसूम. काय करावे कळेना. देऊळही दिसेना. मुक्काम करावे कुठे, प्रश्नच होता. तेवढ्यात एक तरुण दिसला. त्याच्याजवळ गेलो. पाहिलं तर तो एका भिंतीवर आवाज न करता पहारीने घाव घालत होता. मी विचारलं, 'अरे बेटा, इथे कुठे मुक्कामाची सोय होईल का?'

"होईल ना! तुमची हरकत नसेल तर!"

"अरे, अर्ध्या रात्रीचा प्रश्न आहे. कुठंही पाठ टेकायला मिळाली की झालं काम!"

"महाराज, मी एक प्रामाणिक चोर आहे. माझ्या घरी चालेल तुम्हाला?"

"होय चालेल!"

इलाजच नव्हता. मी गेलो. रात्री त्याने दोन फळं दिली. मी शांत झालो. तो म्हणाला, "मी पुन्हा जातोय. सकाळी येईन. तेव्हा भेटू पुन्हा. मला आशीर्वाद द्या."

तो गेला. मी झोपलो. त्याच्या झोपडीत फार सामान नव्हते. त्याच्या छोट्याशा झोपडीत कुणी नव्हते. सकाळी तो आला. मी स्नान करून, पूजा करून जाण्याच्या तयारीत होतो. तो म्हणाला, "काही दिवस जाऊ नका. मला भरपूर माल मिळाला की तुम्हाला कपडे घेऊन देईन. मग जा."

मला त्याची माणुसकी फार आवडली. एकेक दिवस करता करता महिनाभर राहिलो. त्याचा काहीच त्रास नव्हता. दिवसा तो झोपायचा. रात्रभर बाहेर असायचा. रोज त्याचा उत्साह कायम तसाच दिसायचा. एका डब्यात त्याने भरपूर पैसे ठेवले होते. रोज थोडे थोडे खर्च करायचा. 'आज नाही तर उद्या मला मिळेलच' असे म्हणायचा. गाणं गुणगुणायचा. स्वयंपाक करायचा. मस्त मजेत जगायचा.

मी साधना करून कंटाळलो होतो. भक्तीत मन रमत नव्हते. चाळीस वर्षांचा झालो होतो. गुरू शोधत वणवण भटकत होतो. आता सगळं सोडून द्यावं. जीव द्यावा असं वाटत होतं. चोर भेटला अन् मी विचार केला. पाप करणारा इतका सुखात राहू शकत असेल, तर मी पुण्य करणारा आनंदित का नाही? त्याला मी गुरू मानलं अन् थोड्याच दिवसात मला सद्गुरू लाभले."

कुणाकडून उत्तम गुण घ्यावा हे शिष्यानं शिकायला हवंय. पुन्हा आपण अवधानाकडे वळूयात. माऊलींनी म्हटलंय, 'आता अवधान एकले देईजे!' ते याच एकाग्रतेसाठी. सुगृहिणी पाहा, स्वयंपाक करताना कुकर लावते. किती शिट्ट्या झाल्यात हे लक्षात ठेवते. भाजी करते. दूध तापवते. बेल वाजल्यावर कोण आलंय पाहते. फोनवरही बोलते... या साऱ्या क्रिया म्हणजे उत्तम अवधानांचा पुरावा! असो. 'अवधानाचा चारा' असंही माऊलींनी म्हटलंय. संतांचे अनंत उपकार असे उपयुक्त असतात. पैशाचे कर्ज फेडता येते. गुरूचे ऋण तसेच राहते. म्हणूनच जन्मोजन्मी गाठभेट होत राहते. आपल्या सुखासाठी तो दूर जातो. आपणच आपला दिवा व्हावे म्हणून!


जय गुरुदेव!

(arvinddode@gmail.com)



# जगाचा विस्तार

**जीवन संगीत**




**सद्गुरू वामनराव पै**

परमेश्वर हा विषय किती महत्त्वाचा आहे, पण तो न समजल्यामुळे आज अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत व या समस्या सोडवताना समस्त मानव जातीच्या नाकात दम आलेला आहे. या समस्या सोडवल्या जातील की नाही याबद्दल आम्हांला शंका आहे म्हणून हे जीवनविद्येचे तत्त्वज्ञान महत्त्वाचे आहे. परमेश्वर हा आपल्या जीवनाचे अत्यंत महत्त्वाचे स्थान व्यापून आहे. हा परमेश्वर आहे कसा? त्याबद्दल वेदांनी सांगितले "नेती नेती नेती". तो कसा आहे? तुम्ही जे सांगाल ना त्या पलीकडे तो आहे. तुम्ही काहीही सांगा त्याच्या पलीकडे तो आहे. देव कसा आहे हे आपल्याला थोडं सांगता येईल पण देव आहे तसा कुणालाही सांगता येणार नाही. मी काय सांगतो ते नीट ऐका हं. देव कसा आहे याचे आपल्याला थोडेसे वर्णन करता येईल पण तो जसा आहे तसे त्याचे वर्णन करता येणे शक्य नाही. परमेश्वराचे जे दिव्यत्व आहे ते इतके प्रचंड आहे, अलौकिक आहे, विस्मयकारक आहे, आश्चर्यकारक आहे की, त्याची आपण कल्पनाही करू शकत नाही. हजारो माणसे निर्माण झाली पण माणूस म्हणून सर्व सारखेच. हजारो कसले? अब्जावधी माणसे आत्तापर्यंत निर्माण झाली, आजही आहेत यापुढेही होतील, पण माणूस म्हटला की, तो सारखाच. माणूस म्हटला की दोन डोळे, समोर एक नाक, दोन कान हे सर्व अवयव सारखे. किती वाघ निर्माण झाले ते वाघ सर्व सारखेच, कावळे सर्व सारखेच, चिमण्या सर्व सारख्याच हे जर बघितले, तर हे सर्व निर्माण झाले कसे याचा सहसा कोणी विचारच करत नाही. हा निसर्ग आहे म्हणतात. अरे पण हा निसर्गसुद्धा अद्भुत आहे. हा निसर्गसुद्धा तुम्ही पाहायला गेलात, तर त्याचा ठावठिकाणा लागत नाही. निसर्ग प्रचंड आहे. जसा परमेश्वर प्रचंड तसा निसर्गही प्रचंड आहे. त्याने जे जे निर्माण केले ते सर्वच प्रचंड आहे. आता पृथ्वी किती प्रचंड आहे? अशी ही प्रचंड पृथ्वी अनंतकोटी ब्रह्मांडामध्ये एका थेंबाएवढी आहे हे आणखी एक आश्चर्य. अनंतकोटी ब्रह्माण्डे! पूर्वी आम्ही म्हणत होतो की, कदाचित एक हजार दोन हजार सूर्य आहेत, कुणी म्हणाले दहा हजार सूर्य आहेत. आता शास्त्रज्ञ सांगत आहेत मोजता येणार नाहीत इतके सूर्य आहेत. अजूनही निर्मिती इतक्या झपाट्याने चालली आहे की, जगाचा विस्तार होतो आहे. काही लोक म्हणायचे की जगबुडी होणार. जीवनविद्या सांगते जगबुडी कधी होणारच नाही. कारण जगाचा विस्तार सतत होत आहे. हा जगाचा सतत होणारा विस्तार हे परमेश्वराचेच रूप आहे.

# संत हे आपला संबंध भगवंताशी जोडतात

**अध्यात्म**



**ब्रह्मचैतन्य**
**श्री गोंदवलेकर महाराज**

आपले हृदय विषयाने इतके भरले आहे की, तिथे भगवंताच्या प्रेमाला जागाच राहिली नाही. बरे, भगवंताचे प्रेम मुद्दाम तिथे घातले, तर ते आत न राहता बाहेर पडते आणि वाऱ्यावर उडून जाते. सामानाने गच्च भरलेली जशी एखादी खोली असते, तसे आपले हृदय आहे. या हृदयाचा संबंध भगवंताशी जोडण्यासाठी, आपल्या हृदयातले सामान, म्हणजे विषय, खाली करून त्याच्या जागी भगवंताचे प्रेम भरणे जरूर आहे. साधारणपणे आपला अनुभव असा आहे की, एखादी वस्तू आपल्याला पुष्कळ आणि पुन्हापुन्हा मिळाली तरी तिचा वीट येतो; म्हणून जी वस्तू आपल्याला कितीही मिळाली तरी तिचा वीट येणार नाही अशी वस्तू आपण मिळवावी. अशी अवीट असणारी वस्तू एकच आहे; ती म्हणजे भगवंत होय.


राजाने आपल्या नावाचा शिक्का केला आणि जो अती प्रामाणिक होता त्याच्याजवळ दिला; त्याप्रमाणे भगवंताने आपले नाम संतांना दिले. त्यामुळे, संत जे करतील त्याला मान्यता देणे भगवंताला जरूरच आहे. आपण आणि संत यांच्यामध्ये मनुष्य या दृष्टीने फरक नाही; पण फरक आहे तो हा की, संत हा जसे बोलतो तसे वागतो, तर



आपण बोलतो चांगले आणि वागतो मात्र त्याच्या उलट. आपल्या स्वार्थाच्या आड कोणी आले की, आपण वाईट बोलतो. ज्याच्यावर आपण प्रेम करतो त्याच वस्तूवर दुसऱ्याने प्रेम केले, तर आपण त्याला नावे ठेवतो. आपण नुसती नीतीची तत्त्वे जेव्हा सांगतो तेव्हा अगदी चांगले बोलतो; पण वागताना मात्र उलट वागतो. यासाठी आपण अशी कृती करू या, की आपल्याला नंतर तसे बोलता येईल.गाडीत बसायला मिळावे म्हणून काही कोणी गाडीत बसत नाही, तर आपल्या स्टेशनाला जाण्यासाठीच मनुष्य गाडीचा आधार घेतो. तसा, मोठमोठ्या संतांनी प्रपंच केला खरा; परंतु तो सुखासाठी केला नाही. आपल्या वृत्तीपासून न ढळता इतरांना तारण्याचे काम संतांनी केले. बुडणाऱ्या माणसाला जसा दोरीचा आधार द्यावा, त्याप्रमाणे संतांनी आपल्याला परमात्म्याचा आधार दिला. चंदनाच्या झाडाजवळच्या झाडांना जसा चंदनाचा वास लागतो, त्याप्रमाणे संताजवळ राहतो तोही संतच बनतो. काही कष्ट न करता परमार्थ साधणे हेच सत्संगतीचे महत्त्व आहे.

**तात्पर्यः** आपण प्रपंचात इतके खोल जातो की, संतांची हाकच ऐकू येत नाही. ती ऐकू येईल इतक्या तरी अंतरावर असावे.

# संस्कृतीच्या पाऊलखुणा २- वासुदेव!!



सोसायटीमध्ये फन फेअर लागला होता. अलीकडे प्रत्येक सोसायटीमध्ये असतोच. पूर्वी गावांमध्ये जत्रा असायच्या. वर्षातून एकदा येणाऱ्या या जत्रेचं बालपणी केवढं अप्रूप वाटायचं; परंतु आता बदलत्या काळानुसार जत्रेचे रूप सुद्धा बदललं आहे. आजकाल सोसायट्यांमध्येच छोटासा मेळा भरवतात आणि जत्रेची मजा लुटतात. असो... तर सोसायटीच्या या मेळ्यात खाऊपासून ते कपडे, खेळणी सगळ्यांचेच स्टॉल असतात आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे पाश्चिमात्य संस्कृतीप्रमाणे सगळ्यांचं मनोरंजन करण्यासाठी तिथे एक सांताक्लॉज पण असतो. लहान मुले त्याच्यामागे धावत असतात. ते दृष्य बघून मनात विचार आला की पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरण करण्याऐवजी आपल्या संस्कृतीला जतन करण्याचा प्रयत्न का होत नाही. आपल्याकडे ही उत्कृष्ट लोक कलाकार आहेत की? आपला वासुदेवच पहा ना... हो!... आपलाच... कारण याची नाळ आपल्या संस्कृतीशी जोडली गेली आहे... आणि तो कृष्णाशी जोडला गेलाय...

या कृष्ण भक्त वासुदेवाचं नाव ओठावर आलं आणि त्याच ते रूप डोळ्यांसमोर तरळू लागलं. डोक्यावर उभट मोरपिसांची टोपी, गळ्यात रंगीबेरंगी कवड्यांच्या माळा, सफेद पायघोळ अंगरखा, पायांत विजार किंवा धोतर, खांद्यावर आणखी कमरेभोवती उपरणे गुंडाळलेले, एका हातात चिपळ्या, दुसऱ्या हातात टाळ, कमरेला बासरी, मंजिरी आणि काखेला झोळी, हातात तांब्याचे कडे, कपाळावर व कंठावर गंधाचे टिळे आणि पायात घुंगरू अशा वेशात गाणं म्हणत एका हातात चिपळ्या आणि एका हातात टाळ वाजवून गिरकी घेत नाच करणारा वासुदेव गावोगावी दिसायचा.

**मनाचा गाभारा**



**अर्चना सरोदे**

पूर्वीच्या काळी प्रसन्नता घेऊन पहाट अलवार यायची. कोकीळ सुद्धा आपल्या गोड गळ्याने गाणं म्हणून संपूर्ण गावाला जागे करायची. पक्षांच्या किलबिलाटाबरोबरच घराघरांतून जात्यावरच्या ओव्या ऐकू यायच्या. अंगणात सडा सारवण करून रांगोळी घातली जायची. अशा अल्हाददायक पहाटे प्रसन्न आणि मंगलमय वातावरणात कधी चिपळ्या, तर कधी बासरीचा मधुर स्वर कानावर पडायचा आणि मागोमाग नाचत येणारा वासुदेव दिसायचा. घरातल्या सुनेने धान्य, कपडे, पैसे दिले की, दान पावल्याची वर्दी देवाला गाण्यातून द्यायचा.

**दान पावलं दान पावलं !!**
**पंढरपुरामंदी इट्टोबारायाला !!**
**कोंढणपुरामंदी तुकाबीला !!**
**जेजुरीमंदी खंडोबारायाला !!**
**सासवडामंदी**
**सोपानदेवाला !!**
**दान पावलं**
**दान पावलं !!**

असं गाणं म्हणत प्रत्येक देवाला दानं पावल्याचा निरोप द्यायचा. बासरी वाजवून गिरकी घेत दुसऱ्या घरी जायचा. त्याच्यामागे गावातल्या बाल गोपाळांची गर्दी असायची; परंतु आता काळ बदलला तशी परिस्थिती सुद्धा बदलली आहे.

आता हेच पाहा ना... मागच्या वर्षी मी डोंबिवलीला माझ्या मावस बहिणीकडे गेले होते. साधारण आठ साडेआठची वेळ असेल. मला वाड्यात टाळ चिपळ्यांचा आवाज आला म्हणून मी बाल्कनीत जाऊन खाली डोकावून पाहिले, तर वासुदेव दिसला. किती आनंद झाला होता मला तेव्हा... बालपणाच्या सगळ्या आठवणी जाग्या झाल्या. मी खाली जाऊन त्याच्याशी बोलले. म्हटलं एवढं उशिरा का येता? मी लहान असताना आमच्या गावी पहाटेच वासुदेव यायचा. तसं तो हसला आणि म्हणाला " ताई तवाचा काळ येगळा व्हता... तवा लोक रामाच्या पारी (पहाटे) उठायचं... पन आता मातूर लोक सात नंतर उठत्यात... मग आमी जर रामाच्या पारी आलो, तर वसकन अंगावर येत्यात... झोप मोड केली म्हणत्यात... हाकलून देत्यात... कंदी कंदी तर वासुदेव असल्याचा पुरुप (प्रूफ) पण देवा लागतो... त्याच बोलणं ऐकून मन विषण्ण झालं... एवढं होऊनही पिढ्यानपिढ्या जोपासलेली ही कला म्हणजेच त्याच्या वाडवडिलांकडून घेतलेला हा वसा जणू पुढील पिढीला देऊन हजारो वर्षांची सांस्कृतिक परंपरा तो जोपासत असतो आणि आम्ही मात्र आमच्याच संस्कृतीची पावलं मागे खेचण्यात स्वतःला धन्य समजतो. नैतिक मूल्ये जपणाऱ्या या वासुदेवाचे जगणे जरी भटके असले तरी त्याच्या गाण्यातून मात्र तो प्रबोधन करत असतो... शिवाजी महाराजांच्या काळात वासुदेवाने मोलाची कामगिरी बजावली आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ यांनी आपल्या साहित्यातून यांची रूपके मांडली आहेत. हजार/बाराशे वर्षांपासूनची ही कला आधुनिकतेच्या वादळात डोलायमान झाली आहे. या वादळामुळे या कलेच्या पाऊलखुणा मिटू नयेत असे प्रकर्षाने वाटते आणि म्हणूनच पाश्चिमात्य संस्कृती ऐवजी आपल्या संस्कृतीची ओळख नव्या पिढीला करून देण्याची आता खरोखर गरज आहे.

# पहा मगच बोला...

**ऋतुराज**



**ऋतुजा केळकर**

काल एक विचित्र व्हीडिओ पाहिला त्यात एका विशिष्ठ धर्मातील लोक दुसऱ्या धर्माच्या लोकांना पळवून लावण्याच्या घोषणा देत होते. हिंदुस्थान सारख्या देशात हे असे दृश पाहायला मिळावे हे किती दूर्दैवाचे आहे नाही का? मग मनात प्रश्न निर्माण झाला, 'सर्व धर्म समभाव' असलेल्या या देशातील मुख्य धर्म हा 'हिंदू' आहे. खरतर त्याची उत्पत्ती, तर चार ते पाच हजार वर्षांपूर्वी झालेली आहे तरीही या आपल्या हिंदुस्थानात ही परिस्थिती निर्माण व्हावी ही खरतर प्रत्येक हिंदूला अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे.

हिंदू धर्म हा जगातील सर्वात जुना आणि सतत प्रचलित राहिलेला धर्म मानला जातो, त्याची सुरुवात किमान ४,००० ते ५,००० वर्षांपूर्वी झाली असल्याचे मानले जाते. आता याचा इतिहास म्हणाल तर, वैदिक काल म्हणजे इ.स. पूर्व १५००-५०० की जेव्हा ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद या वेदांचा उदय झाला आणि यज्ञसंस्कृती आणि ऋषींकडून त्यांच्या गुरुकुलात जाऊन तिथे राहून घेतलेले ज्ञान हा एक व्यक्तीच्या आध्यात्मिक विकासाचा आणि परंपरेचा भाग होता आणि उपनिषदांचे म्हणाल तर खरतर त्यांची संख्या निश्चित नाही; परंतु सुमारे शंभर ते दोनशे उपनिषदे हिंदू साहित्यात आहेत पण त्यातील १०८ उपनिषदे प्रचलित असली तरी मुख्य १३ उपनिषदे तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची आहेत. तसं पाहायला गेलं तर वेद हे ज्ञानाचे मूलभूत स्रोत मानले जातात. यात फक्त देवांच्या उगमांची किंवा अध्यात्मिक पूजापाठाची माहिती आहे असे नव्हे, तर उपनिषदे ही त्यांच्या तात्त्विक आणि गूढ अर्थावर तसेच आध्यात्मिक ज्ञान आणि आत्मसाक्षात्कार यावर भर देतात. नैसर्गिक शक्तींचे आपल्या जीवनातील महत्त्व आणि प्रभाव तसेच कर्मयोगाचा संदेश यात आहे. शिवाय व्यावहारिक जीवनाचे मार्गदर्शन देखील यात समग्र आहे. तसेच संस्कृतमधील हे साहित्य आपल्याला फक्त आपल्या संस्कृतीच्या जवळच नेत नाही, तर जीवनातील मूलभूत सत्यदेखील उलगडून सांगतात. तसे पाहिले तर वेद तसेच उपनिषदांप्रमाणेच संस्कृतमधील श्लोकही तितकेच अर्थपूर्ण आहेत. आज त्यातीलच एक श्लोक इथे आठवला आणि तो म्हणजे,


**ईक्षणं द्विगुणं**
**भुयात्भाषणस्येति वेधसा|**
**अक्षिणी द्वे मनुष्याणां**
**जिह्वा चैकेव निर्मिता||**

याचा अर्थ असा आहे की, बोलण्याच्या दुप्पट निरीक्षण केले पाहिजे, म्हणून निर्मात्याने माणसांसाठी दोन डोळे आणि एकच जीभ बनवली आहे.




अगदी परवा परवाची बातमी की जी पटकन कुणाच्याही लक्षात देखील आली नाही, एका चॅनलवर धक्कादायक बातमी म्हणून अगदी व्हीडिओ सकट त्यांनी सांगितले की, 'मटणाच्या दुकानाच्या लाईनमध्ये एक कुत्रा 'शिरला' आता मला सांगा मासे किंवा मटणाच्या दुकानात कुत्रा "शिरला" ही काही धक्कादायक बातमी आहे का? आता ही बातमी अगदी विस्तृत आली होती पण बातम्यांच्या ओघात ती कुणाच्याही लक्षातच आली नाही. इथेच मी आता जो श्लोक म्हटला त्याचा अर्थ समजतो असं नाही का वाटत? आता यात मीडिया काय कशा आणि त्याच्या चॅनलचे टीआरपी वाढवायला काय करतात काय नाही याबद्दल मला आता मुळीच बोलायचे नाही. पण आपण काय काय बोलतो यापेक्षा आपण काय पाहतो यावर जर जास्त भर दिला, तर बरं होईल, त्यामुळे नेहमीच आपण समोरच्याला जास्त चांगल्या पद्धतीने ओळखू शकू. इथे मला आणखी एक गोष्ट आठवते ती म्हणजे सध्या काजोलची गाजत असलेली एक आईस्क्रीमची जाहिरात आणि त्यात प्रचंड बोलणारी ती आईस्क्रीम तोंडात गेल्यावर हरवून जाणारी. पटकन हसायला लावणारी ती जाहिरात बरच काही शिकवून जाते. ते म्हणजे, बोलण्यापेक्षा पाहण्याची क्षमता ही नेहमीच द्विगुणित असावी. परमेश्वराने माणसाला दोन डोळे दिले, पण जीभ मात्र एकच दिली आहे आणि जगात बघण्यासारख्या खूप गोष्टी आहेत पण त्यातूनच शिकण्यासारख्या बऱ्याच गोष्टी आहेत.

आता फक्त याच श्लोकाचा अर्थ घ्यायचा झाला तर जिव्हा ही एकच का? तर शब्दांची ताकद मोठी असते. त्यांचा योग्य वापर करावा. तसे देखील 'तोंडातून शब्द आणि भात्यातून तीर' हा एकदा का बाहेर पडला की तो परत येत नाही. भात्यातील तीराचे म्हणाल तर तो जखम करून जातो तर शब्दांचे म्हणाल तर ते मनावर खोलवर परिणाम किंवा समोरच्या व्यक्तीवर आपला प्रभाव ठेवून जातो आणि समाजात आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसाच उमटवून जातो. म्हणूनच संवाद आणि विचार यांचे संतुलन राखणे आवश्यक आहे आणि विचारांवर तसेच आचारावर संतुलन तेव्हाच राहील जेव्हा आपण जास्त निरीक्षण करू. म्हणूनच नेहमी मनुष्याने अधिक पाहावे, निरीक्षण करावे आणि मगच विचारपूर्वक बोलावे.



मनुष्याला दोन डोळे दिले गेले आहेत, जे अधिक पाहण्याची क्षमता देतात. याचा अर्थ समजून घेण्यावर भर द्यावा हे जरी खरे असले तरीही त्याचा अर्थ योग्यत्या पद्धतीने काढणे तितकेच गरजेचे आहे. म्हणूनच या श्लोकात सांगितल्याप्रमाणे समाज, शिक्षण आणि वैयक्तिक जीवनात संयम, विचारशीलता आणि सतर्कता बाळगणे गरजेचे आहे. तसेच सकारात्मक आणि नकारात्मक परिणामदेखील लक्षात घेतले पाहिजेत की जे आज हिंदू संस्कृतीच्या रक्षणार्थ अत्यंत गरजेचे आहे.

कोण कुठे काय बोलतोय? काय वागतोय? याकडे आपले व्यवस्थित लक्ष असेल तर आणि फक्त तरच आपला धर्म, आपली परंपरा आणि आपले अस्तित्व टिकून राहील. शेवटी आपलं आचरण हेच महत्त्वाचे असते आणि शब्द आणि कृती यावरच ते अवलंबून असते. आपल्या शरीराच्या चेतनेचे तेज हे जर स्थिर ठेवायचे असेल, तेजस्वी करायचे असेल तर ते अति प्रभावी आणि इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती आणि क्रियाशक्ती ही तीनही तत्वे जर एकवटली तरच त्यातून भौतिक सौंदर्याच्या प्रत्यंच्यातून शरीर, मन आणि बुद्धीचा योग्य तो वापर करून योगक्षेम साधता येईल.

# शिक्षकासह पोलीसाला भर चौकात मारले

**बोंबला** | **सिरसाळ्यातील घटना, गुन्हा दाखल**

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:शिक्षकासह पोलीस कर्मचाऱ्यांस भर चौकात जबर मारहाण केल्याची घटना सिरसाळ्यात घडली आहे. या प्रकरणी सिरसाळा पोलीस स्टेशन मध्ये शिक्षक पंजाब श्रीरंग येडे रा.परळी वैजनाथ यांच्या फिर्यादीवरुन मारहाण करणारा साहिल आक्रम खॉन पठाण रा. सिरसाळ या विरुद्ध सिरसाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या विषयी शिक्षक पंजाब येडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सविस्तर वृत्त असे कि, पंजाब श्रीरंग येडे हे दिनांक २४/०४/२०२५ रोजी दुपारी १ वाजता पंजाब येडे लिटल फ्लावर्स उच्च माध्यमीक विद्यालय परळी शाळा सुटली नंतर घरगुती काम असल्याने सहकारी प्रविण माणिकराव ठोंबरे सोबत चार चाकी गाडी क्र.एम एच -२३-बीएच-२९३२ ने सिरसाळा मार्गे बीडला जात होते. दुपारी १ वाजताच्या दरम्यान सिरसाळा येथे चहा पिण्यासाठी ते थांबले असता त्यांच्या कारपाठीमागुन मोटारसायकल साहिल आक्रम खॉन पठाण याने हा ज्या दुचाकीवरून आला ती दुचाकी क्र.एम एच -४४ -एए-९४४९ ने कारला धडक दिली व कारचे नुकसान केले.



त्याने असे का केले ? असे पंजाब येडे यांनी विचारले असता साहिल आक्रम खॉन पठाण याने थेट त्या शिक्षकाच्या गचुरीला धरुन शिवीगाळ करीत जबर मारहाण केली. शिक्षक येडे यांना मारहाण होत असतांना पाहुन पोलीस तेथे आले व त्यास म्हणाले की पोलीस स्टेशनला चल त्या वेळेस साहिल पठाण याने पोलीसाच्या गचोरीला धरुन मारहाण केली. थोड्यावेळाने तेथे इतर पोलीस आले, त्यांनी सर्वांना पोलीस ठाणे सिरसाळा येथे घेवुन गेले . या प्रकरणी साहिल आक्रम खॉन पठाण या विरुद्ध कलम ११५ ( २) , ३५१ ( २ ) , ३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### आरोपी ताब्यात घेतला पण अटक नाही , झाला फरार

शिक्षक पंजाब येडे यांनी फिर्यादीत असे म्हटले आहे कि,मारहाण करतांना व पोलीसाला देखील मारहाण केल्या नंतर साहिल आक्रम खॉन पठाण यास आलेल्या पोलीसांनी ताब्यात घेतले, पोलीस स्टेशन येथे घेऊन गेले असे फिर्यादीत स्पष्ट म्हटले आहे. परंतु साहिल पठाण हा अटक केला नाही पोलीस स्टेशन मधून पोलीसांच्या समोर निघून गेला असे समजते आहे.

## कलाकेंद्रावर पोलिसांची कार्यवाही !

दणका:पुण्यभूमीच्या बातमीची दखल


Page 6
09 Apr 2025
दैनिक बीड
पुण्यभूमी
संपादक : बाळासाहेब मस्के
कला केंद्राच्या नावाखाली वेश्या व्यवसाय?
चर्चा:केज तालुक्यात अनेक लॉज मालक मालामाल

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: तालुक्यातील कलाकेंद्राच्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरू असलेल्याची बातमी दैनिक पुण्यभूमी वृत्तपत्रांच्या माध्यमातून प्रसिद्ध करण्यात आली होती तरी पोलिस प्रशासनाने दखल घेऊन काल, २३.०४.२५ च्या मध्यरात्री बीड पोलिसांनी उमरी शिवार, तालुका केज, जिल्हा बीड येथील महालक्ष्मी कला केंद्रावर छापा टाकला.सदर छापेमारी दरम्यान, सदर प्रतिष्ठानाचा व्यवस्थापक कला केंद्रात काम करणाऱ्या महिलांना अनैतिक कृत्यांमध्ये गुंतवून वेश्याव्यवसायाला चालना देण्यात सक्रियपणे सहभागी असल्याचे आढळून आले. परिणामी, सदर आस्थापनेच्या परिसरातून १० महिलांची सुटका करण्यात आली.त्यानुसार, राज्याच्या वतीने अनैतिक वाहतूक प्रतिबंधक कायदा कलम ३, ४, ५ आणि ६, तसेच भारतीय दंड संहितेच्या कलम पान २ वर

## साहित्याभूषण पुरस्कार जाहीर

दखल:विक्रम शिंदेंना अण्णाभाऊ साठे पुरस्कार

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:अखिल भारतीय स्वाभिमानी संघर्ष सेना, महाराष्ट्र राज्य या संस्थेचे २०२५ चे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाले असून या वर्षीचा साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे साहित्य भूषण पुरस्कार युवा साहित्यिक विक्रम शिंदे यांना जाहीर झाला आहे. मराठी साहित्य विश्वात अत्यंत कमी वयात भरीव योगदानासाठी हा पुरस्कार त्यांना दिला जाणार आहे. अखिल भारतीय स्वाभिमानी संघर्ष सेना आणि पी. थो. सामाजिक संस्थेच्या माध्यमातून कराड येथे १ जुलै रोजी या पुरस्काराने विक्रम शिंदे यांना गौरवण्यात येणार आहे. राज्यस्तरावर सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रात भरीव योगदान



देणाऱ्या कार्यकुशल व्यक्तींना दरवर्षी पुरस्कार देऊन गौरविले जाते. रचनात्मक पातळीवर कार्य करणाऱ्यांनाच या पुरस्काराचा बहुमान मिळतो.

विक्रम शिंदे यांचे साहित्य क्षेत्रातील कार्य वाखाणण्याजोगे असून त्यांच्या माध्यमातून संविधानिक मूल्यांवर आधारीत आजवर शेकडो दर्जेदार ग्रंथांची निर्मिती झाली आहे. त्यांनी ६ पुस्तकांचे लिखाण केले असून अनेक पुस्तकांचे संपादन ही केले आहे. शंभरहून अधिक युवा तरूणांना साहित्य क्षेत्रात यशस्वी कवी लेखक म्हणून घडविण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रभर ४० पेक्षा जास्त प्रकाशन संस्था नव्याने सुरू झाल्या आहेत. यातूनच अनेक युवक प्रकाशन व्यवसायात रचनात्मक काम करत आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील आयोजक म्हणून असणारे त्यांचे बहुमूल्य योगदान, पान २ वर


## परळीत महात्मा बसवण्णांची जयंती

आवाहन:पत्रकार भवनात होणार कार्यक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: लिंगायत धर्माचे संस्थापक, क्रांतिवीर युगपुरुष महात्मा बसवण्णा यांची ९२० वी जयंती २५ एप्रिल रोजी लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवन येथे साजरी होणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन परळी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन हे करणार आहेत. या वेळी विशेष अतिथी म्हणून औष्णिक विद्युत केंद्र, परळीचे सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड उपस्थित राहणार आहेत.

नागवंशी बसवण्णांची कालजयी वचन संपदा आजही दिशादर्शक आहे, या विषयावर मराठवाडा साथीचे कार्यकारी



संपादक ओमप्रकाश बुरांडे हे मार्गदर्शन करणार आहेत. या वेळी राजू कोकलगावे, आत्मलिंग शेटे, संजय खाकरे, ए. तु. कराड सर, चेतन सौंदळे, ड. मनोज संकाये, धनंजय आरबुने, धनंजय आढाव, महादेव पान २ वर

## केज बसडेपोसाठी आंदोलन

आक्रमक:विकास संघर्ष समितीचे आंदोलन

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: येथे बसडेपो मंजूर करा व इलेक्ट्रिक बसगाड्या चार्जिंग सेंटर सुरू करा या मागणीसाठी केज विकास संघर्ष समितीच्या वतीने मंगळवारी लाक्षणिक उपोषण करण्यात आले.

केज येथे बसडेपो मंजुरीसाठी समिती गेली वीस वर्षे विविध आंदोलनाच्या रूपाने पाठपुरावा करत आहे. केज हे तालुक्याचे ठिकाण आता दोन प्रमुख महामार्गाच्या जोडणीवर आल्याने येथून दररोज हजारो प्रवासी येथून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात बसगाड्यांनी प्रवास करत असतात. त्यामुळे येथे बसडेपो झाल्यास येथून आवश्यक त्या लांब पल्याच्या व स्थानिक परिसरात प्रवाशांच्या गरजेनुसार आवश्यक गाड्यांचे




व्यवस्थापन करणे शक्य होणार आहे. यासाठी केज शहरात बीड रोड लगत राज्यपरिवहन मंडळाची सात एक्करहून अधिक जागा आरक्षित जागा सध्या पडून आहे. या जागेवर बसडेपो झाल्यास केजच्या विकासात भर पडणार आहे.

आजच्या लाक्षणिक उपोषणास केज तहासिलचे तहसीलदार राकेश गिड्डे आणि किल्लेधारूर आगार प्रमुख श्री चौरे यांनी भेट देऊन याबाबत सकारात्मक अहवाल पाठवून सतत पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. या लाक्षणिक उपोषणात समितीचे समन्वयक हनुमंत भोसले, शेषराव घोरपडे, श्रीमती इंदूबाई घोरपडे, भाग्यश्री पैठणकर, नासेर मुंडे, महेश जाजू, प्रवीण देशपांडे, पान २ वर

## केज वनविभाग झोपले का?

बोंबला:सर्कलमध्ये अवैध वृक्षतोड



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: तालुक्यातील चिंचोली माळी सर्कल मध्ये गेल्या काही महिन्यांपासून अवैधरित्या वृक्षतोड करून तोडलेले हे लाकूड दररोज सायंकाळी पाचनंतर दोन ते तीन ट्रेक मध्ये बीडचे व्यापारी तोडत आहेत लाकडाच्या व्यवसायात मोठा नफा असल्याने चिंचोली माळी सर्कल मध्ये बीडच्या अवैध वृक्ष तोड करणाऱ्या टोळ्या कार्यरत आहेत. या टोळ्या चिंचोली माळी सर्कल मध्ये हादगाव, ढोका, पान २ वर

## जवळबन सेवा सोसायटी बिनविरोध

अभिनंदनिय:आडसकरांच्या नेतृत्वात मारली बाजी

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील जवळबन येथील सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक बिनविरोध झाल्याने हरिभाऊ करपे व बळीभाऊ करपे यांचे गावकऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

या विषयी सविस्तर वृत्त असे की विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म. जवळबन ता. केज जिल्हा बीड या संस्थेची सर्वसाधारण अनुसचि जाती/अनुसूचीत जमाती, विमुक्त व भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्गिय आणि महिला राखीय या मतदारसंघातील सन २०२५ ते २०३० या कालावधीची निवडणूक बिनविरोध पार पडली आहे तरी भाकरे नितीन अर्जुन, करपे प्रवीण चंद्रकांत ,करपे दिगांबर बब्रुवान,करपे शिरू ज्ञानोबा ,गायकवाड कैलास महादेव,गायकवाड दशरथ शहाजी ,करपे अर्जुन



हरीभाऊ, भाकरे बालासाहेब पांडुरंग , करपे शोभा अशोक महिला, पारेकर करुणाबाई शिवाजीराव ,जोगदंड एकनाथ चंद्वाप्पा ,घाडगे गोवर्धन वैजनाथ ,करपे गणेश विठ्ठलराव एवढे सदस्य निवडून आले त्या पैकी बळीभाऊ करपे व हरिभाऊ करपे बिनविरोध निवडून जिंकल्यामुळे त्यांचे विविध स्तरांवरून अभिनंदन करण्यात येत आहे.

## पहलगाम हल्ल्याचा दुखवटा

निर्णय:बीड येथील भीमगीतांचा कार्यक्रम रद्द

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांची संयुक्त जयंती साजरी करण्यासाठी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक डॉ.अनिरूद्ध वनकर यांचा कार्यक्रम दि.२५ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला होता. परंतु पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात अनेक निष्पाप नागरिकांचा दुर्दैवी मृत्यु झालेला आहे. याचा दुखवटाम्हणून जयंती उत्सव समितीकडून भीमगीतांचा कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे.


भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची संयुक्त जयंती आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासून अखंडितपणे साजरी केली जाते. याहीवर्षी आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२५ एप्रिल २०२५ रोजी बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सायंकाळी ६ वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक डॉ.अनिरूध्द वनकर यांचा भीमगीतांचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. परंतु जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी भारतातील विविध भागांतून पर्यटनासाठी गेलेल्या नागरिकांवर भ्याड हल्ला केला. या हल्ल्यात अनेक निष्पाप लोकांचे जीव गेले. ही घटना अत्यंत दुःखद आहे. त्यामुळे बीड येथील भीमगीतांचा नियोजित कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले संयुक्त जयंती उत्सव समितीकडून घेण्यात आला आहे. याबाबत जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष ड.सिध्दार्थ शिंदे यांच्याकडून माहीती देण्यात आली आहे.

**मंत्री पंकजा मुंडे** | **मेंढपाळ कुटुंबाना फायदा**

# चराई अनुदान थेट बँक खात्यात

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या वतीने राज्यातील भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील ३०५४ मेंढपाळांना सन २०२४-२५ या वर्षासाठी चराई अनुदानापोटी सुमारे ७.३३ कोटी अनुदानाचे थेट हस्तांतरण (डीबीटी)द्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत. मेंढ्यांच्या चराई करिता राज्यातील मेंढपाळांना अर्थ सहाय्य उपलब्ध झाल्यामुळे मेंढपाळांना शाश्वत उत्पन्नाचा स्रोत्र निर्माण झालेला आहे आणि त्यांच्या आर्थिक प्रगतीस हातभार लागला असल्याची भावना पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली आहे.



महाराष्ट्र राज्यामध्ये मेंढीपालन व्यवसाय हा पूर्णपणे स्थलांतरित पद्धतीने केला जातो. पावसाळी हंगामामध्ये मेंढपाळ त्यांच्या मूळ गावी परत आल्यानंतर पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये मेंढ्यांना चराई करिता क्षेत्र उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे चाऱ्या अभावी मेंढ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन त्यांची उत्पादकता कमी होऊन मेंढपाळ कुटुंबाचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे राज्यामधील मेंढपाळ कुटुंबाना माहे जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये मेंढ्यांसाठी चाऱ्याची कमतरता भरून काढण्यासाठी चराई अनुदान देण्याची योजना पशुसंवर्धन विभाग व इतर मागासवर्गीय विभाग यांच्या मार्फत राबविली जात असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

राज्यामध्ये या योजनेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी पान २ वर

## परळीत पहलगाम घटनेचा निषेध



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:पहलगाम येथे निर्दोष लोकांवर झालेले आतंकी हल्लयाचा जाहीर निषेध व हल्लयात मृत्यूमुखी झालेल्याना इमदादुल उलूम शाळेच्या विद्यार्थी, शिक्षकांच्या वतीने श्रद्धांजली कार्यक्रम घेण्यात आला.

परळी येथील इमदादुल उलूम शाळेत गुरुवार दि.२४ रोजी पहलगाम येथे निर्दोष लोकांवर झालेले आतंकी हल्लयाचा जाहीर निषेध व हल्लयात मृत्यूमुखी झालेल्याना श्रध्दांजली अर्पित करण्यात आली.यावेळी इमदादुल उलूम शाळेचे विद्यार्थी व शिक्षक,कर्मचारी सहभागी होते.